महाराष्ट्र शासनाचा २००६-२००७ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी मंगळवार, दिनांक २१ मार्च २००६ रोजी
केलेले भाषण

## भाग पहिला

महोदय,

मी आपल्या अनुमतीने सन २००६-०७ या वर्षाचा राज्याचा वार्षिक अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

**स्थूल आर्थिक आढावा.** २. स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय पातळीवर देशांतर्गत स्थूल उत्पन्न आधीच्या वर्षी ७.५ टक्के वाढीच्या तुलनेत सन २००५-०६ या वर्षामध्ये ८.१ टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे. या तुलनेत स्थिर किंमतीनुसार महाराष्ट्राचे स्थुल राज्य उत्पन्न आधीच्या वर्षाच्या ८.४ टक्के वाढीच्या तुलनेत २००५-०६ मध्ये ८.६ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे.

**राज्याचे उत्पन्न.** ३. सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००५-०६ हे प्रकाशन उपलब्ध करून देण्यात आले आहे. राज्याचे निव्वळ उत्पन्न प्रचलित किंमतीनुसार सन २००४-०५ या वर्षी रुपये ३,२८,४५१ कोटी असून ते सन २००३-०४ मधील राज्य उत्पन्नापेक्षा १३.१ टक्क्यांनी जास्त होते. सन २००४-०५ मधील रुपये २३,२२२ इतक्या अंदाजित राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत राज्याचे अंदाजित दरडोई उत्पन्न रुपये ३२,१७० इतके होते.

**किंमत निर्देशांक.** ४. अखिल भारतीय घाऊक किंमतीच्या निर्देशांकावर आधारित वार्षिक चलन वाढीचा दर जानेवारी २००५ साठी असलेल्या ५.५ टक्केच्या तुलनेत जानेवारी २००६ करिता ४.४ टक्के इतका होता.

४.१ सन २००५-०६ या वित्तीय वर्षात औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमतीच्या सरासरी निर्देशांकावर आधारित चलन वाढीचा दर ४.२ टक्के इतका होता. हा वाढीचा दर मागील वर्षाच्या तत्सम कालावधीत ३.७ टक्के होता.

**औद्योगिक उत्पादनाचे निर्देशांक.**

५. अखिल भारतीय औद्योगिक उत्पादनाचा सरासरी निर्देशांक एप्रिल ते डिसेंबर २००५ या कालावधीकरिता २१५.४० होता. त्यात मागील वर्षाच्या तुलनेत ७.८ टक्के एवढी वाढ झाली. तसेच वस्तु निर्माण क्षेत्राच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकामधील अशी वाढ ८.९ टक्के होती.

**पत दर्जा.**

६. मी मागच्यावर्षीचे अंदाजपत्रक सादर करतेवेळी अशी आशा व्यक्त केली होती की, राज्याच्या वित्तीय परिस्थितीमध्ये होणाऱ्या सकारात्मक बदलांची वित्तीय व बँकींग संस्था दखल घेतील. मला हे सांगताना विशेष आनंद होत आहे की, राज्य शासनाच्या विविध महामंडळांद्वारे उभारलेल्या पतरोख्यांचा पतदर्जा **गुंतवणुकीस योग्य** या स्तरापर्यंत सुधारलेला आहे. राज्याची वित्तीय स्थिती स्थिर होऊन राज्याच्या पतदर्जात आगामी वर्षात उत्तरोत्तर वाढ होत जाईल असा मला पूर्ण आत्मविश्वास आहे.

**शासकीय कर्ज.**

७. राज्य शासनावर अर्थसंकल्प बाह्य कर्जासह वाढणारा कर्जाचा डोंगर हा नेहमीच चर्चेचा विषय राहीला आहे. विविध शासकीय महामंडळांकरिता कर्जरोख्यांच्या माध्यमातून अर्थसंकल्पबाह्य कर्ज घेण्याचे आम्ही आता पूर्णपणे बंद केलेले आहे. मात्र केंद्र शासनाद्वारे राष्ट्रीय अल्पबचत निधी अंतर्गत न मागता मिळणारे कर्ज हा एक नवा मुद्दा उपस्थित झाला आहे. सुयोग्य राज्यकोषिय धोरणामुळे कर्जाचे सकल राज्य स्थूल उत्पन्नाशी (GSDP) २००३-२००४ या वर्षी २९.७७ टक्के

इतके असलेले प्रमाण २००४-०५ या वर्षी २९.३६ टक्के इतके कमी झाले आहे. राष्ट्रीय अल्पबचत निधीतून सतत व न मागता मिळणारे कर्ज कमी झाले असते तर कर्जाचे एकंदर ओझे आणखी कमी होण्यासाठी मदत झाली असती. याबाबत केंद्र शासनाशी माझी चर्चा चालू असून यामधून लवकरच मार्ग निघेल अशी मला आशा आहे. त्यामुळे कर्जाचे सकल राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण अधिक ठोस प्रमाणात कमी होईल. सन २००६-०७ या वर्षीच्या राज्य स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत, अर्थसंकल्पबाह्य कर्जासह एकूण कर्ज २९.९६ टक्के इतके वाढेल असा अंदाज आहे.

**७.१.** राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ आणि राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक या सारख्या संस्थांशी नियमित संवाद साधून जास्त व्याजदराच्या कर्जाचा बोजा कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**सन २००५-०६ या वर्षातील राजकोषिय स्थैर्यता.**

**८.** राज्याची उत्तरोत्तर वाढणारी महसुली तूट आणि महसुली जमेच्या तुलनेत वाढणारे कर्ज ही गेल्या दशकातील आर्थिक अडचणींची मुख्य कारणमिमांसा आहे. राज्याने अनेक वर्षाच्या कालावधीनंतर सन २००५-०६ मध्ये प्रथमच रुपये २६५ कोटीचे आधिक्य अंदाजित केले होते. परंतु, अभुतपूर्व पुर परिस्थिती, शेतकऱ्यांना आपत्ती प्रसंगी द्यावयाच्या मदतीचे पॅकेज व वीजेकरिता वाढीव आर्थिक अनुदान यामुळे या वर्षात शासनाच्या दायित्वात अनपेक्षित वाढ झाल्यामुळे सन २००५-०६ यावर्षी रुपये १,४१९ कोटीची महसुली तूट संभवते. असे असले तरी, सन २००४-०५ या वर्षी असलेल्या रुपये १०,०३३ कोटीच्या महसुली तूटीच्या तुलनेत ही प्रगती लक्षणीय ठरते. या ठिकाणी मी सन्माननीय सदस्यांच्या नजरेस आणून देऊ इच्छितो की, चालू वर्षी अनपेक्षित

नैसर्गिक आपत्ती कोसळली असतांनाही मी आपणांस दिलेल्या आश्वासनानुसार कैक वर्षाच्या कालावधीनंतर सन २००५-०६ चा संपुर्ण अर्थसंकल्प कोणत्याही प्रकारची काटछाट न करता यशस्वीरित्या अंमलात आणण्यात आला आहे.

**सन २००६-०७ मधील महसुली आधिक्य.**

**९.** मला सभागृहास सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये ३०५.८५ कोटीचे महसुली आधिक्य अंदाजित करण्यात आले आहे. महसुली जमेच्या तुलनेत कर्जाची टक्केवारी ही २९.९६ टक्क्यावरुन २८.२५ टक्के इतके कमी होईल असा अंदाज आहे.

**९.१.** सन २००६-०७ या वर्षाचे महसुली आधिक्य वाढले असते. तथापि, विजेवरील जादा अनुदानाकरिता केलेली तरतूद, अर्थसंकल्पबाह्य कर्जाच्या व्याजापोटी देण्यात आलेले रुपये १,०९१ कोटी आणि मुंबई शहर दळणवळण कार्यक्रमाकरिता (MUTP) देण्यात आलेले रुपये ४०० कोटीचे अनुदान हे महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमानुसार केलेल्या उत्कृष्ठ लेखांकनाची पद्धत अवलंबिल्याने भांडवली खर्चाऐवजी महसुली खर्च म्हणून वर्गीकरण करण्यात आल्यामुळे कमी झालेले आहे.

**महसुली जमेमध्ये वृध्दी.**

**१०.** राज्याचे सन २००५-०६ या वर्षाचे महसुली उत्पन्न राज्य स्थूल उत्पन्नाच्या वाढीपेक्षा अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. सन २००५-०६ च्या सुधारित अंदाजानुसार महसुली जमा रुपये ५२,१९८ कोटी अंदाजित आहे व त्याची वाढ सन २००४-०५ तुलनेत २७.२७ टक्के इतकी आहे. सन २००५-०६ ची महसूली जमा १३.३१ टक्क्याने वाढ होईल अशी अपेक्षा आहे व त्याप्रमाणे ती रुपये ५९,१४५ कोटी अंदाजित केलेली आहे.

**योजनेतर खर्चावर निर्बंध.**

**११.** सन २००५-०६ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार योजनेतर खर्च आधीच्या वर्षाच्या तुलनेत ४.४४ टक्के इतका आहे. तो सन २००६-०७ या वर्षात १.२९ टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. योजनेतर खर्चावरील नियंत्रण हे परिरक्षणावरील खर्चात काटछाट न करताही तसेच वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याज प्रदान यावर ठोस नियंत्रण ठेवल्यामुळे शक्य झाले आहे. दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून जे कर्मचारी शासन सेवेमध्ये प्रवेश करतील त्यांच्यासाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना अंमलात आणण्यात आलेली आहे. यामुळे शासनाच्या निवृत्ती वेतनावरील दायित्व भविष्यात सुसह्य राहील. सन १९९९-२००० यावर्षी वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याजप्रदान यावरील एकूण खर्च महसुली जमेच्या ८१ टक्के इतका होता. तो सन २००५-०६ या वर्षी ६२.६५ टक्के इतका राहील आणि सन २००६-०७ या वर्षाकरिता ६०.१७ टक्के इतका अंदाजित करण्यात आलेला आहे. विविध प्रशासकीय विभागांचा पदांचा आढावा व आकृतिबंध निश्चित केल्यानंतर त्यांना रिक्त पदे भरण्याची अनुमती दिली असतानाही योजनेतर खर्चामधील ही कपात निश्चितच लक्षणीय आहे.

**महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे पालन.**

**१२.** महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम २००५ पारित केल्यानंतर शासनाने महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम २००६ जारी केलेले आहेत. सदर नियम चालू अधिवेशनामध्ये दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. या अधिनियमामध्ये अंतर्भूत केल्यानुसार मी सन २००६-०७ साठीचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्र आणि राजकोषिय धोरणाच्या आखणीचे विवरणपत्र अर्थसंकल्पासोबत सभागृहापुढे ठेवणार आहे. महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय

व्यवस्थापन नियम, २००५ च्या नियम ८ नुसार विवरणपत्रे सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**कर्जाचे एकत्रिकरण आणि व्याज दरात कपात.** **१३.** महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीनुसार दिनांक ३१ मार्च २००४ रोजी असलेल्या रुपये ६,७९९ कोटीच्या कर्जाचे एकत्रिकरण करून त्यावरील व्याजाचा वार्षिक दर सध्या प्रचलित असलेल्या ११.४८ टक्के सरासरी व्याजाच्या दरावरुन ७.५ टक्के इतका कमी करण्यात आलेला आहे.

**कर्ज माफी.** **१४.** बाराव्या वित्त आयोगाने शिफारस केल्यानुसार केंद्र शासन सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीमध्ये एकत्रित कर्जमाफी देणार आहे. यासाठी राज्याची महसुली तूट दरवर्षी कमी करून ती सन २००८-०९ पर्यंत शुन्यावर आणावयाची आहे. यानुसार शासन दरवर्षी महसुली तूट कमी करण्यात महाराष्ट्र शासन यशस्वी ठरले तर दरवर्षी रुपये ३४० कोटी याप्रमाणे सन २००५-०६ पासून आगामी ५ वर्षात कर्जमाफी मिळण्यास पात्र ठरेल. सन २००४-०५ या वर्षी महसुली तूट कमी न केल्यामुळे सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये ३४० कोटीची कर्जमाफी मिळणार नाही. सन २००५-०६ या वर्षी लक्षणीय प्रगती केलेली असल्यामुळे सन २००६-०७ यावर्षी रुपये ३४० कोटीचे कर्ज सवलत मिळण्याची शक्यता आहे. सन २००५-०६ या वर्षात शासनाने महसुली तूटीमध्ये मोठ्या प्रमाणात घट केली आहे या आधारावर सन २००५-०६ या वर्षासाठीची कर्ज सवलत सन २००६-०७ मध्ये देण्याची विनंती मी केंद्र शासनास केलेली आहे.

व्यवसाय सुरु रण्यासाठी सुविधा.

१५. आर्थिक विकास जलदगतीने होण्यासाठी सौहार्दपूर्ण गुंतवणूकीचे वातावरण असणे आवश्यक आहे. सध्याच्या आपल्या प्रचलित पद्धतीनुसार कोणताही उद्योग किंवा व्यवसाय सुरू करण्यापूर्वी अनेक अडथळे पार करावे लागतात त्यामुळे राज्याच्या विकास खुटतो. महाराष्ट्र एक अग्रगण्य राज्य असल्याने या बाबतीतही योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने उद्योग, व्यापार किंवा धंदा प्रारंभ करण्यापूर्वी विविध नियम, अधिनियम यांच्या अंतर्गत सर्व करेतर नोंदणीकरण आणि परवाना यांची आवश्यकता तपासून पाहण्यासाठी एक अभ्यासगट स्थापन करण्याचे मी प्रस्तावित करित आहे. हा गट उद्योग जगताशी सल्लामसलत करून खालील बाबीचे उद्दीष्ट साधण्यास्तव विचार करेल.

(अ) कालबाह्य अशा नोंदणी किंवा परवाने रद्द करणे,

(ब) सर्व परवाना व नोंदणीकरणासाठी कमीत कमी, शक्यतो एकच, अर्ज आवश्यक असणे.

(क) विविध शासकीय यंत्रणांशी कमीत कमी पाठपुरावा करावा लागणे, आणि

(ड) प्रमाणपत्र किंवा परवाना सहजतेने प्राप्त होण्यासाठी या प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व कार्यक्षम करणे.

मी ही प्रक्रिया डिसेंबर, २००६ पूर्वी पूर्ण करण्याचे ठरविले आहे.

योजनेतर योजनांची पुर्न तपासणी.

१६. एखादी योजना सुरू झाल्यानंतर तहहयात अस्तित्वात राहते. ज्या योजना आखताना प्रसंगानुरुप गरजेच्या होत्या परंतु कालौघात त्यांची उपयोगीता व प्रसंगानुरुपता संपुष्टात आलेली आहे, या योजनांची पुनश्चः छाननी करण्याची वेळ आलेली

आहे. बऱ्याच योजनांकरिता अर्थसंकल्पीय तरतूद इतकी तुटपुंजी असते की, त्यामुळे अपेक्षित उद्दिष्ट गाठणे शक्यच नसते. अनेक प्रकरणी कमी अर्थसंकल्पीय तरतुदीमधूनही अपेक्षित उद्दिष्ट साध्य होऊ शकते. त्यामुळे सर्व योजनेतर योजनांचा सखोल आढावा घेऊन त्यातून अधिक चांगली फलनिष्पत्ती व्हावी याकरिता मी एक लहान गट स्थापन करण्याचे प्रस्तावित करीत आहे. हि प्रक्रीया डिसेंबर २००६ पुर्वी पूर्ण करण्यात येईल.

**नागरी स्थानिक संस्थांच्या राजकोषिय सुधारणेकरिता उत्तेजन.**

**१७.** राज्यातील ४३ टक्के जनता नागरी विभागात राहत आहे. नागरी विभागातील "अ", "ब" व "क" नगरपालिकामधील व्यवस्थापन सक्षम करणे, नगरपालिकांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करणे व त्यांच्या कर आकाराणीत सुधारणा होण्याबरोबरच नगरपरिषदांची कामगिरी सुधारण्याच्या दृष्टीने राज्यातील "अ", "ब" व "क" नगरपरिषदांमधील ज्या नगरपरिषदा दरडोई वार्षिक महसूली मागणी व दरडोई महसूली जमेत लक्षणीय वाढ करतील त्यांना उत्तेजनार्थ अनुदान देण्यासाठी रुपये ५० कोटी इतकी रक्कम मी राखून ठेवत आहे.

**पाटबंधारे क्षेत्रातील खर्चाचे व्यवस्थापन.**

**१८.** आंतरराज्यीय लवादाच्या निवाड्यामुळे शासनास पाणी त्वरेने अडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाटबंधारे प्रकल्प सुरू करावे लागले आहेत.दरवर्षी उपलब्ध साधन संपत्तीची वाटणी अनेक पाटबंधारे प्रकल्पावर करण्यात आल्याने त्या प्रमाणात सिंचनक्षमतेमध्ये वाढ झाली नाही. उपलब्ध साधनसंपत्तीतून जास्तीतजास्त सिंचन क्षमता निर्माण व्हावी यादृष्टीने उपलब्ध निधी प्रकल्पनिहाय वाटण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. शासन आणि विविध पाटबंधारे महामंडळाद्वारे हाती घेतल्या जाणाऱ्या सिंचन क्षेत्रातील साधनसंपत्तीचे आता मा. राज्यपालांनी दिलेल्या निदेशांच्या चौकटीत राहून प्रकल्प निहाय वाटप करण्यात आलेले आहे.

यामुळे आगामी वर्षात अतिरिक्त दोन लाख हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येईल असा अंदाज आहे. राज्यास याचा जास्तीतजास्त फायदा व्हावा यासाठी, या बाबतीत सर्व निर्वाचित सदस्य सहकार्य करतील अशी मला अपेक्षा आहे.

**फलनिष्पत्ती अर्थसंकल्प.** १९. शासनाने राबविलेल्या विविध योजनांचे लाभ प्रत्यक्षात जनता व समाजापर्यंत किती प्रमाणात व कशा पद्धतीने पोहोचले आहेत, तसेच त्यांची उद्दीष्टे साध्य झाली आहेत का, यावर नियंत्रण ठेवण्याचे व तपासणी करण्याचे काम सुरू करण्याचे या शासनाने ठरविले आहे. यास्तव सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पीय वर्षापासून माझ्या शासनाने असा निर्णय घेतला आहे की, १२ विभागांच्या काही महत्वाच्या योजनांचे प्रायोगिक तत्त्वावर फलनिष्पत्ती अर्थसंकल्प तयार करावे, जेणेकरून योजनेतून लोकांचे जीवनमान उंचावेल व असे केल्याने शासनाचा खर्च सत्कारणी लागेल.

**मासिक निधी व्यवस्थापन.** २०. सन्माननीय सदस्यांना आठवत असेल की, मागील अर्थसंकल्पात मी मासिक निधी विवरणपत्र संकल्पना मांडली होती. त्यानुसार सर्व शासकीय विभागांची मासिक निधी विवरणपत्रे मी सदनाच्या पटलावर ठेवली होती. या प्रयोगामुळे विभागांना वर्षभरात त्यांचा खर्च आवश्यकतेनुसार करण्याची मुभा मिळाली व मार्च महिन्यात अधिकाधिक खर्च करण्यास आळा बसला. या प्रयोगाचे यश पहाता हा प्रयोग पुढे चालू ठेवण्याचा व खर्चाच्या व्यवस्थापनात आणखी सुधारणा करण्याचा मी निर्णय घेतला आहे. हे सत्र संपण्यापूर्वी सर्व शासकीय विभागांचे मासिक निधी विवरणपत्र सदनाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**वार्षिक योजना २००६-०७.** २१. राज्याची सन २००६-०७ ची रुपये १३,००० कोटीची प्रारुप वार्षिक योजना, योजना आयोगास सादर करण्यात आली होती. योजना आयोगाने त्यामध्ये साधनसंपत्ती मध्ये होणारी संभाव्य वाढ विचारात घेऊन वार्षिक योजना २००६-०७ चे आकारमान

रुपये १४,८२९ कोटी निश्चित केले आहे. त्यामध्ये रुपये १,३०० कोटी प्रतिसाधित कर्जाचा समावेश आहे. सन २००६-०७ च्या वार्षिक योजनेतील प्रस्तावित नियतव्यय राज्याच्या साधन संपत्तीशी निगडीत असल्यामुळे ही योजना वास्तववादी आहे.

**मुलभूत सोयी-सुविधा, कृषी व नगर विकासावर भर.**

**२२.** राज्यातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी व विकासाच्या सुविधा राज्यातील ग्रामीण जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी सन २००६-०७ ची योजना तयार करताना मुलभूत सोयी-सुविधांच्या क्षेत्रांसाठी अधिकाधिक तरतूदी केल्या जातील, याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यात आलेले आहे. सन २००६-०७ च्या वार्षिक योजनेत उर्जा, रस्ते व बांधकाम, जलसंपदा, पाणीपुरवठा, या विकास क्षेत्रांना अधिक मोठ्या प्रमाणात वाढीव तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

**२२.१** राज्यातील अधिकाधिक भागाचे नागरीकरण होत असल्याने, नगर विकास सारख्या क्षेत्रांखालील विविध योजनांना अधिक प्रमाणात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

**जिल्हा योजनेसाठी वाढीव तरतूद.**

**२३.** गेले काही वर्ष जिल्हा योजनेचे आकारमान ७०० कोटी रुपये होते. त्यात मी रुपये २०० कोटींची भरीव वाढ करून सन २००६-०७ साठी रुपये ९०० कोटीचे आकारमान निश्चित केले आहे. जिल्हातील अपुऱ्या लघुपाटबंधारे योजनाकरिता रुपये ४७ कोटी, आरोग्य विभागाच्या इमारतीकरिता रुपये २० कोटी, रस्ते व साकव बांधकामासाठी रुपये ३२ कोटी, पाणीपुरवठ्याच्या अंतिम टप्प्यातील योजनाकरिता रुपये १६ कोटी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या बांधकामासाठी रुपये १२ कोटींची वाढीव तरतूद जिल्हा योजनेत करण्यात आली आहे.

**वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ.** २४. राज्याच्या समतोल विकासासाठी सन १९९४ साली विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या भागांसाठी तीन स्वतंत्र वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यात आली असून, या मंडळांना दि. ३० एप्रिल, २०१० पर्यंत म्हणजेच पुढील ५ वर्षासाठी केंद्र शासनाने मुदतवाढ दिली आहे.

**अनुशेष** २५. मागील चार-पाच वर्षापासून पाटबंधारे क्षेत्र वगळून इतर ८ विकास क्षेत्रांचा अनुशेष दूर करण्यासाठी प्रतिवर्षी साधारणत: १००० कोटीपेक्षा अधिकची तरतूद दरवर्षी करण्यात येते. त्या प्रमाणात खर्च होत नसल्याने याबाबत आढावा घेण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीने घेतलेल्या आढाव्यानुसार अनुशेष दूर करण्यासाठी निधी खर्च करण्याबाबत काही प्रशासकीय/तांत्रिक अडचणी दिसून आल्या या अडचणी आगामी कालावधीत दूर करुन अनुशेष निधी पुर्णपणे खर्च करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सन २००६-०७ साठी पाटबंधारे वगळता इतर विकासक्षेत्रांचा अनुशेष दूर करण्यासाठी रु.१४७५ कोटी नियतव्यय ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये रुपये ४६५.८० कोटी आरोग्य, ३८५.८६ कोटी रस्ते, ३४९.५८ कोटी कृषी पंपांचे विद्युतीकरण, १३८.६५ कोटी तांत्रिक शिक्षण या क्षेत्रामधील अनुषेश दुर करण्यासाठी ठेवले आहेत.

**ई-पे बिलिंग पध्दत.** २६. शासनाने ई-पे बिल प्रकल्पा अंतर्गत शासकीय देयके आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून थेट कोषागारांकडे संगणक प्रणालीच्या माध्यमातून सादर करण्याचे ठरविले आहे. यामुळे वेळेची बचत व शासकीय कामकाजात पारदर्शकता येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे भारतातील ई-पे बिल पद्धत अंगिकारणारे प्रथम राज्य ठरले आहे. तसेच, शासनाने डिसेंबर २००५ पासून ६ लाख शासकीय कर्मचाऱ्यांना धनादेशाद्वारे वेतन प्रदानाची पद्धत सुरू केली आहे.

**सहकार क्षेत्रातील सहभागाने संयुक्त प्रकल्प.** **२७.** सहकार क्षेत्रांतर्गत अनेक सुतगिरण्या प्रकल्प उभे राहीले असून ते आवश्यक निधी अभावी वेळेवर पूर्ण होऊ शकत नाहीत. शासनाने आता असे काही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी संयुक्त माध्यमातून खाजगी भांडवलाद्वारे पूर्ण करण्याच्या शक्यता अजमावण्याचे ठरविले आहे.

**पाटबंधारे विकास महामंडळे बंद करणे.** **२८.** शासनाने पाच पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना विविध भागातील पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केली होती. सद्य स्थितीत पाटबंधारे प्रकल्पाच्या विकासासाठी तसेच कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असणारा संपूर्ण निधी अर्थसंकल्पिय तरतूद करून भागविला जातो. त्यामुळे शासनाने पाटबंधारे विकास महामंडळे बंद करण्याची प्रक्रीया सुरू करण्याचे ठरविले आहे.

**वीज निर्मिती कार्यक्रम.** **२९.** सध्या राज्यात वीजेची उपलब्धता व मागणी यामध्ये लक्षणीय तफावत निर्माण झाली असून या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

**२९.१** महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीचे परळी व पारस येथील औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पांचे काम लवकरच पूर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पांमार्फत राज्यास पुढील वर्षात ५०० मेगावॉट वीज मिळण्यास सुरूवात होईल. त्याचप्रमाणे घाटघर येथील जलविद्युत प्रकल्पामार्फतही अतिरिक्त २५० मेगावॉट वीज येत्या वर्षात उपलब्ध होईल असे अपेक्षित आहे.

**२९.२** महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीने येत्या ५ वर्षात ७,५०० मेगावॉट विद्युत निर्मिती क्षमता असलेल्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांचा एकूण अंदाजित खर्च रुपये २९,२७८ कोटी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने राज्यातील

पारेषण व वितरण प्रणालीत सुधारणा व बळकटीकरण करण्यासाठी अनुक्रमे रुपये ४,९०० कोटी व रुपये ११,००० कोटींच्या योजना प्रस्तावित केल्या असून पुढील ५ वर्षात या योजना पूर्ण होऊन त्याद्वारे विद्युत पुरवठ्याच्या दर्जात सुधारणा होऊन ग्राहकांना प्रत्यक्षात लाभ मिळण्यास सुरूवात होईल अशी अपेक्षा आहे. या योजनांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन व ग्रामीण विद्युतीकरण महामंडळासमवेत अनुक्रमे रुपये २,००० कोटी व रुपये ३,००० कोटी कर्जासाठी सामंजस्य करार केले आहेत.

**दुर्गम भागाचे विद्युतीकरण.**

**३०.** राज्यातील ज्या दुर्गम भागात पारंपारिक पद्धतीने वीज पुरविणे शक्य होणार नाही अशा १६० गावे, वाड्या व पाड्यांचे विद्युतीकरण अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांव्दारे सन २००६-०७ या वर्षात करण्यात येणार आहे. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ६.७५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**सिंगल फेजींग योजना.**

**३१.** भारनियमनाची तीव्रता काही प्रमाणात कमी व्हावी या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत सिंगल फेजींग योजना राबविण्यात येत आहेत.

**३१.१.** सध्या ही योजना राज्यातील ७,००० खेड्यांमध्ये लागू करण्यात आली असून या योजनेच्या माध्यमातून सुमारे ८२५ मेगावॉट इतक्या भाराचे व्यवस्थापन करणे शक्य झाले आहे. या योजनेत पुढील वर्षी अतिरिक्त ४,५०० खेड्यांचा समावेश केला जाणार आहे.

**फिडर सेप्रेशन योजना.**

**३२.** या योजनेअंतर्गत पुढील वर्षात ५,००० खेड्यांमधील फिडर सेप्रेशनचे काम करण्याचे प्रस्तावित असून परिणामस्वरुप या खेड्यांमधील भार नियमनाचा कालावधी कमी होण्यास सहाय्य होणार आहे.

**अक्षय प्रकाश योजना.** **३३.** या योजनेचे स्वरुप ग्राहकांच्या सहकार्याने भार नियमन कमी करणे असे असून ग्राहकांनी कमाल मागणीच्या विशिष्ट कालावधीत वीज वापरावर स्वनियंत्रण ठेवणे आणि अनधिकृत वीज वापर संपूर्णपणे थांबविणे आवश्यक आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळत असून सध्या ही योजना २,५०० गावांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.

**राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना.** **३४.** राज्यातील एकूण ४१,०९५ गावांपैकी ३५,५४१ गावांचे विद्युतीकरण झाले असून उर्वरीत ५,५५४ गावांचे विद्युतीकरणाचे काम राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत समाविष्ट आहे. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत राज्यातील ३३ जिल्ह्यांसाठी रुपये ४२७ कोटींच्या योजना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीद्वारे यापूर्वीच सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी धुळे, वर्धा व गोंदिया जिल्ह्यांच्या योजनांना मंजूरी मिळालेली आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण घरकुलांना विद्युत पुरवठा उपलब्ध करण्यासाठी १०० टक्के अनुदानाची तरतूद आहे.

**कृषी पंपांचे विद्युतीकरण.** **३५.** राज्यात डिसेंबर २००५ अखेर एकूण २६.२४ लक्ष कृषी पंपांचे विद्युतीकरण झाले आहे. सन २००५-०६ या वर्षामध्ये १ लक्ष कृषीपंपांच्या उद्दिष्टांपैकी डिसेबर २००५ अखेरपर्यन्त ५०,४५७ कृषीपंपांना विद्युत पुरवठा करण्यात आला आहे. सन २००६-०७ या वर्षासाठी सुद्धा १ लक्ष कृषीपंपांच्या विद्युतीकरणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**ऊर्जेचे संवर्धन** **३६.** राज्यातील सध्याची वीज टंचाईची परिस्थिती लक्षात घेता मी सर्व जनतेला आवाहन करीत आहे की, वीजेची बचत करण्याच्या हेतूने वीजेची कार्यक्षमपणे बचत करणारी उपकरणे आणि जेथे शक्य असेल तेथे पर्यायी व्यवस्था म्हणून सौर उर्जेचा

वापर करावा. तसेच सर्व शासकीय व निम शासकीय इमारतींमध्ये आगामी वर्षात वीजेची कमीत कमी २० टक्के बचत करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत कार्यक्रम.

**३७.** शासन अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांद्वारे पर्यावरण संतुलन साधुन वीज निर्मितीस प्रोत्साहन देते. राज्यात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीसाठीच्या प्रोत्साहनात्मक धोरणांतर्गत, आजपर्यंत ९५५ मेगावॉट क्षमतेचे, लघु जल विद्युत प्रकल्पासहीत प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

ऊर्जा अंकुर निधी.

**३८.** या प्रकल्पांच्या गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी गुंतवणुकीच्या माध्यमातून "ऊर्जा अंकुर निधी"नावाचा विश्वस्त कोष स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्याद्वारे पुढील ३ वर्षाच्या कालावधीत अंदाजे १,००० मेगावॅट वीजनिर्मितीचे अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहेत.

कामगार अधिनियम.

**३९.** मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ मध्ये सुधारणा करून रुपये १,००० प्रतिमाह ऐवजी रुपये ६,५०० इतके वेतन असणाऱ्या कामगारांसाठी या अधिनियमांच्या तरतूदी लागू केल्या आहेत.

**३९.१.** वेतन प्रदान अधिनियम, १९३६ मध्ये दुरुस्ती करून रुपये १,६०० वरुन रुपये ६,५०० इतके प्रति महिना वेतन असणाऱ्या कामगारांसाठी या अधिनियमांच्या तरतूदी लागू केल्या आहेत.

औद्योगिक गुंतवणूक.

**४०.** महाराष्ट्राने देशातील प्रगत औद्योगिक राज्य असा लौकिक कायम राखला आहे. महाराष्ट्र हे प्रगतीशील औद्योगिक धोरणे, अत्युकृष्ट पायाभूत सुविधा आणि उद्योग व्यवसायासाठी

अनुकूल वातावरण यामुळे देशी व विदेशी गुंतवणूकदारांसाठी प्रथम पसंतीचे राज्य राहिले आहे.

**४०.१.** शासनातर्फे अत्याधुनिक दर्जाच्या भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीला चालना देण्यासाठी तसेच औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकवाढीसाठी गुंतवणूकदारांना पोषक धोरण आखित आहे. या नविन गुंतवणूक धोरणामध्ये पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, व्यापारासाठी सुविधा, करप्रणालीचे सुसुत्रीकरण, कामगार कायद्यात सुधारणा व शासकीय यंत्रणेशी सुसंवाद यावर भर राहणार आहे.

**माहिती तंत्रज्ञान.**

**४१.** शासनाच्या माहिती तंत्रज्ञान धोरणास अनुकूल प्रतिसाद मिळत आहे. नियोजनानुसार मुंबई-पुणे क्षेत्र ज्ञान महामार्ग म्हणून आकार घेत आहे. देशातील एकूण आऊटसोर्सींगच्या कामापैकी २३ टक्के काम राज्यातील बिझनेस प्रोसेस आउट सोर्सिंग व नॉलेज प्रोसेस आउट सोर्सिंग घटक पार पाडत आहेत. पुणे हे देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूकीसाठी सर्वोत्कृष्ठ ठिकाण व्हावे म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

**४१.१.** विशाल प्रकल्पांची व्याख्या बदलण्यात आली असून आता 'अ' व 'ब' वर्गीकृत क्षेत्रात रुपये ५०० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या अथवा १,००० पेक्षा जास्त व्यक्तींना रोजगार देणाऱ्या प्रकल्पांना तसेच क, ड, ड+ वर्गीकृत क्षेत्र आणि विना उद्योग जिल्ह्यांमध्ये रुपये २५० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करणाऱ्या अथवा ५०० पेक्षा जास्त व्यक्तींना रोजगार देणाऱ्या प्रकल्पांना विशाल प्रकल्प म्हणून संबोधण्यात येईल. मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या मर्यादेपर्यंत एकत्रित प्रोत्साहने देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली आहे.

**राज्यातील मागास भागामध्ये उद्योगांना प्रोत्साहन देणे.**

४२. राज्यातील मागास भागामध्ये उद्योगांना प्रोत्साहन देण्याची योजना बऱ्याच वर्षापासून राबविण्यात येत आहे. उद्योगांना सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत द्यावयाच्या थकित अनुदानासाठी ३१ मार्च २००६ पर्यंत रुपये २८० कोटी देण्यात येतील. सन २००६-०७ साठी रुपये ९८.४६ कोटीची तरतूद केली आहे.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजना.**

४३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये ४४९.९२ कोटी इतकी सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ६४७.३३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**पिण्याच्या पाण्याची टंचाई.**

४४. राज्यात समाधानकारक पावसामुळे १६६ गांवे व १२३ वाड्यांना सद्यस्थितीत दिनांक २८ जानेवारी २००६ रोजी १६३ टँकर्सद्वारा पाणी पुरवठा केला जात आहे. मागील वर्षी याचवेळेस २७६ गांवे व ७७ वाड्यांना २५६ टँकर्सने पाणी पुरवठा केला जात असल्याचे तुलनात्मक दृष्ट्या दिसून येते. राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील टंचाई निवारणार्थ सन २००४-०५ या आर्थिक वर्षात रुपये १८९.९७ कोटी खर्च करण्यात आले आहेत. तर सन २००५-०६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत रुपये ११० कोटी इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. यापुढेही आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**हागंणदारी मुक्त गाव अभियान व निर्मल ग्राम पुरस्कार.**

४५. राज्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या जोडीला हांगणदारी मुक्त गाव अभियान सुरू करण्यात आले आहे. राज्यातील १,६८७ ग्रामपंचायती डिसेंबर २००५ अखेरपर्यंत हांगणदारी मुक्त झालेल्या आहेत. केंद्र शासनाने निर्मल ग्राम पुरस्कार नुकतेच जाहीर केले आहेत. देशातील एकूण ७६१ ग्राम पंचायतींना व ९ पंचायत समित्यांना मिळालेल्या निर्मल ग्राम

पुरस्काराच्या तुलनेत देशात सर्वात जास्त महाराष्ट्रातील ३८० ग्राम पंचायती व १ पंचायत समितीने पुरस्कार पटकाविलेला आहे हीच स्मृहणीय बाब आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील मुलभूत व महत्वाच्या प्रश्नाकडे जाणिवपूर्वक लक्ष देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने अंगीकारलेले धोरण यशस्वी होत आहे याचे हे उदाहरण आहे.

**श्री. संत जगनाडे महाराज स्मारक**

**४६.** श्री. संत जगनाडे महाराज यांचे मौजे सदुंबरे, जिल्हा पुणे येथील स्मारक व परिसराच्या विकासासाठी सन २००६-०७ यावर्षीच्या अंर्थसंकल्पामध्ये रुपये १.५ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना.**

**४७.** राज्य शासनाने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पूरक आहाराचा पुरवठा महिला मंडळांमार्फत आणि महिला बचत गटांमार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत बचत गट चळवळ अधिक बळकट करण्याचे प्रस्तावित असून ६५,००० बचत गटांमार्फत महिलांना सक्षम बनविण्यासाठी आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी अंतर्गत तेजस्विनी प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

**राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनची स्थापना.**

**४८.** राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशनची स्थापना एप्रिल-२००५ मध्ये झालेली आहे. ह्या मिशनचे प्रमुख उद्दिष्ट ६ वर्षाखालील श्रेणीमधील III व IV बालकांचे कुपोषण कमी करणे असा आहे.

**४८.१.** ह्या मिशनमार्फत पहिल्या टप्प्यामध्ये पाच आदिवासी जिल्ह्यामध्ये कुपोषण कमी करण्याचे काम सुरू केले आहे. अंगणवाडी कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील २.०७ लाख बालके एप्रिल २००५ ते जानेवारी २००६ या कालावधीत नव्याने या

कार्यक्रमाखाली आणण्यात आली आहेत. यापैकी १.७५ लाख बालकांचे वजन-मापन करून श्रेणी निहाय वर्गीकरण करण्यात आलेले आहे. या वर्षामध्ये श्रेणी III आणि IV च्या कुपोषित बालकांची संख्या ८,४८३ नोंदविण्यात आलेली होती. ती आता जानेवारी २००६ अखेर ७,३१४ झालेली आहे. या मिशनमार्फत प्रशिक्षणे, कार्यशाळा आणि क्षेत्र भेटी इत्यादी कार्यक्रम राबविल्यामुळे कुपोषण कमी होण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

**महाराष्ट्र मानव विकास मिशन.**

**४९.** महाराष्ट्र हे प्रगतशील राज्य असले तरीही काही भागातील दरडोई उत्पन्न अतिशय कमी असून आरोग्य व शिक्षणासारख्या मूलभूत सोयी पुरेशा नाहीत. राज्याच्या सन २००२ च्या पहिल्या मानव विकास अहवालाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, राज्यातील आहे रे व नाही रे यांच्यात फार मोठी तफावत आहे व ती तफावत दूर करण्यासाठी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रीत करून तेथे शिक्षण, आरोग्य व दरडोई उत्पन्नात सुधारणा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मानव विकास मिशन ची स्थापना करण्यात येईल. राज्य शासनाने श्री. के. बी. भोगे, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना या मिशनच्या प्रमुख पदी नियुक्त करण्यात येईल व नियोजन विभाग या मिशनच्या कामगिरीमध्ये व आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण इत्यादी विभागामध्ये समन्वयाचे काम करेल. या मिशनला सन २००६-०७ मध्ये रुपये ५० कोटीची सुरूवातीला लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे.

**दळणवळण सुधारण्या करिता व्यवहार्यतेचा अभ्यास.**

**५०.** राज्यातील प्रमुख विकसित केंद्राकडे मनुष्यबळ व साधनसामुग्री यांची वाहतूक किती कमी वेळात व खर्चात होते यावर दुर्गम भागाचा विकास अवलंबून असतो. जलद रेल्वेमार्ग व रस्ते यातील गुंतवणूकीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने

महाराष्ट्रातील अविकसित भागात चहू बाजूंनी खुली होण्यास चालना मिळते. राज्यातील रेल्वे व रस्ते जोडणी याचा विकास सार्वजनिक व खाजगी क्षेत्र यांच्या सहभागातून निश्चित काल मर्यादेत राबविण्याच्या दृष्टीने व्यवहार्य कृती आराखडा तयार करण्यासाठी रुपये ५ कोटी इतका निधी राखून ठेवत आहे.

**स्वर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेखाली विशेष प्रकल्प.**

**५१.** स्वर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेचा मुख्य भर दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना महिला बचत गटांना अनुदानित कर्ज पुरवठा करून दारिद्र्यरेषेवर नेण्याचा आहे. याच योजनेखाली प्रत्येक जिल्ह्यासाठी रुपये १५ कोटींचा विशेष प्रकल्प हाती घेण्याची सुविधा आहे. महाराष्ट्रातील फक्त ७ जिल्ह्यांनीच काही प्रमाणात या विशेष प्रकल्पांचा फायदा घेतला असून जिल्हा नियोजन समितीस प्रकल्पाच्या २५ टक्के राज्य सरकारचा हिस्सा देण्यास येणाऱ्या अडचणी हे याप्रमाणेच एक कारण असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे. मानव विकास निर्देशांकात पिछाडीवर असलेल्या जिल्ह्यांमध्ये असे प्रकल्प घेतल्यास राज्य सरकारच्या २५ टक्के हिश्श्याची तरतूद करण्यासाठी रुपये २८.४९ कोटींचा निधी राखीव ठेवण्यात येईल व त्यातून केंद्राच्या सहभागाने रुपये ८० कोटीचा एकत्रित खर्च करण्यात येईल.

**आदिवासी उपयोजना.**

**५२.** सन २००६-०७ या वर्षातील आदिवासी उपयोजनेंतर्गतचा नियत व्यय वाढवून तो रुपये १,००० कोटी इतका ठेवण्यात आला आहे, यात विविध आदिवासी विभागाच्या लोकोपयोगी योजना घेण्यात आल्या आहेत.

**राजर्षी शाहू महाराज आरोग्य योजना.**

**५३.** ग्रामीण भागातील गरजू व दुर्बल घटकांना आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने राजर्षी शाहु महाराज आरोग्य योजना सन २००३-०४ व २००४-०५ मध्ये राबविण्यात आली. सदर योजनेअंतर्गत विकास अहवालामध्ये केलेल्या व आरोग्यदृष्ट्या

निर्देशांकात कमी पडलेल्या १५ जिल्ह्यांची अग्रक्रमाने निवड करण्यात आली आहे व त्यानंतर सर्व जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविला आहे. या जिल्ह्यांतील आरोग्य संस्थांना उपकरणे, यंत्र सामुग्री, बाल अतिदक्षता कक्ष, सौर उर्जा उष्णजल संयत्र, सुरक्षित बाळंतपणाकरिता प्रसूती कक्षाचे बळकटीकरण या सुविधा व रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रथम संदर्भ सेवा आणि दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यास वैद्यकीय कर्मचारी यांची क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट सन २००६-०७ मध्ये सदर योजनेसाठी रुपये १०.४२ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची स्थापना**

**५४.** आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान हा एक विकास कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. महाराष्ट्रात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विविध कार्यक्रम घेण्यासाठी शासनाने डॉ. वसंत गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची स्थापना केलेली असुन त्या मार्फत प्रथम टप्प्यात जलसंवर्धन, ऊर्जा संवर्धन, अन्नप्रक्रिया, ग्रामीण उद्योग, तंत्रज्ञान हस्तांतरण, विज्ञान प्रसार, पेटंट माहिती केंद्र, सोलापूर येथील विज्ञान केंद्र हे प्रकल्प शासन हाती घेणार आहे. सन २००६-०७ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ रुपये १० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत.**

**५५.** राज्यामध्ये जुलै ते ऑक्टोबर २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व महापुर यामुळे शेती पिकांचे / फळबागांचे ५० टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेल्या सुमारे ३ लक्ष आपदग्रस्त शेतकऱ्यांना रुपये ४१७.६८ कोटी इतकी मदत देण्यात आली.

**विदर्भातील सहा जिल्हयांकरिता विशेष पॅकेज.**

**५६.** राज्य शासनाच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा अत्यंत चिंतेचा मुद्दा आहे. मागील काही वर्षामध्ये राज्यातील शेतकऱ्यांकडून होत असलेल्या आत्महत्येची कारणमिमांसा व मुलभूत कारणांचा शोध घेवून त्यावर उपाययोजना म्हणून राज्य शासनाने विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या सहा जिल्ह्यांसाठी एक विशेष पॅकेज जाहिर केले आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी पुढील योजना राबविण्यात येणार आहेत :—

(अ) शासनाने विदर्भातील विशेषत: कापूस उत्पादक शेतकऱ्यांकरिता एक विशेष योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, या अंतर्गत कापूस एकाधिकार योजनेखालील जमा असलेला भांडवल उभारणी निधी व्याजासहीत शेतकऱ्यांना परतफेड करावयाचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी रुपये ३५० कोटीचा पहिला हप्ता आर्थिक वर्ष २००५-०६ मध्ये उपलब्ध करून दिली आहे व उर्वरित रक्कम आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये अदा करण्यात येईल.

(ब) राज्यात उद्‌भवलेल्या विविध नैसर्गिक कारणांमुळे कापूस उत्पादनात मोठी घट झाली आहे. शासनाने अशा आपदग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी एक विशेष बाब म्हणून प्रति हेक्टरी रुपये १,००० याप्रमाणे २ हेक्टर पर्यंत मदत रोखीने देण्याचा निर्णय घेतला आहे. याकरिता रुपये २०० कोटी निधी यापुर्वीच देण्यात आलेला आहे. याचा लाभ राज्यातील सुमारे २२ लक्ष शेतकऱ्यांना मिळणार आहे.

(क) विदर्भातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या सहा जिल्ह्यांतील एकूण ६०,००० शेतकऱ्यांना पुढील ३ वर्षात उत्तम शेती करता यावी, यासाठी प्रत्येक शेतकऱ्याला एकूण रुपये २५,००० पर्यंत ३ वर्षाच्या कालावधीत मदत देण्यात येणार आहे.

यासाठी रुपये १५० कोटींचा नियतव्यय उपलब्ध करून दिला जाईल. या योजनेमध्ये जमीन सुधारणा, खते वाटप, पीक संरक्षण/ शेतीची सुधारीत अवजारे, इनवेल बोअरींग, जुनी विहीर दुरुस्ती, पाईप लाईन, पंपसंच वाटप, पुष्पोत्पादन, परसबाग, इत्यादी घटक समाविष्ट आहेत.

(ड) सेंद्रीय शेती अभियानाद्वारे सेंद्रीय प्रकल्प राबविण्यात येणार असून याद्वारे सेंद्रीय शेतीचा प्रसार व प्रचार तसेच प्रमाणिकरणासाठी सहाय्य करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्याला या अभियानाच्या टप्प्या अंतर्गत रुपये ५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

(इ) कै. वसंतराव नाईक, शेतकरी स्वावलंबन मिशन कार्यरत असलेल्या ६ जिल्ह्यांमध्ये सामुहिक विवाहाची योजना हाती घेतली असून त्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास वस्तुरुपाने रुपये १०,००० ची मदत व या विवाहाचे आयोजन करणाऱ्या संस्थेस प्रोत्साहन म्हणून संयोजनाचा खर्च भागविण्यासाठी प्रत्येक जोडप्यामागे रुपये १,००० चे अनुदान देण्यात येणार आहे. सन २००६-०७ या वित्तीय वर्षात सदर योजनेसाठी रुपये ३.६७ कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे

ग्रामीण पतपुरवठा.

**५७.** शासनाने राज्यातील शेतकऱ्यांना पीककर्ज पतपुरवठा अधिक लाभदायक होण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने स्थापन केलेल्या प्रा. अे. वैद्यनाथन समितीने अल्पमुदत कर्जाच्या संदर्भात केलेल्या शिफारशी राज्यात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील पतपुरवठा संरचना अधिक सक्षम होऊन प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात व आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल.

**पत संस्थांकडून कृषी कर्ज पुरवठा**

**५८.** राज्यातील नागरी सहकारी पत संस्थांवर कृषी कर्ज पुरवठा करण्याबाबत असलेली बंदी उठविण्यात आली असून पत संस्थांना कृषी कर्ज पुरवठा करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

**वस्त्रोद्योगा मार्फत रोजगार निर्मिती.**

**५९.** वस्त्रोद्योगामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्यात कोटा प्रणाली संपुष्टात आल्यामुळे आता सुत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग यांना निर्मिती व निर्यातीत भरपूर वाव अपेक्षित असल्यामुळे या उद्योगास चांगले दिवस आले आहेत. तेव्हा त्या दृष्टीने शासनातर्फे सहकारी तत्वावर सुत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग यांना अधिकाधिक प्रोत्साहन व मदत करण्याचे शासनाचे धोरण राहील. सद्य:स्थितीत जागतिक बाजारपेठेचा विचार करता निर्यातक्षम, दर्जेदार कापडाच्या उत्पादनासाठी रॅपिअर, सुल्झर इ. सारख्या अत्याधुनिक शटललेस यंत्रमागांची, निटींग, विव्हिंग, व गारमेंट युनिटची उभारणी करण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्यात येईल. सहकारी तत्वावरील सुत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्थांना जास्तीत जास्त संस्थेने राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर होणारे कापूस उत्पादन लक्षात घेता नवीन सुत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग युनिट उभारण्यास तसेच जुन्या व आर्थिक अडचणींत असलेल्या वस्त्रोद्योगातील सहकारी संस्थांना पुनर्जिवित करण्यासाठी तसेच त्यांचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण करण्यासाठी शासनातर्फे विशेष आर्थिक पॅकेज तयार करण्यात येईल. शासनाच्या या प्रोत्साहनात्मक धोरणामुळे वस्त्रनिर्मिती उद्योगामध्ये प्रचंड वाढ होणार असून त्यामुळे निर्यातवृध्दीही होणार आहे. पर्यायाने राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

**पीक विमा.**

**६०.** राज्यातील पिक विमाधारक शेतकऱ्यांना सन २००४-०५ या वर्षात एकूण रुपये १३१.१४ कोटी इतकी रक्कम विमा नुकसान भरपाई पोटी अदा करण्यात आली आहे. सन २००५-०६ या वर्षासाठी पिक विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व तद्नुषंगीक खर्चासाठी राज्य हिश्श्यापोटी रुपये ५५ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यापैकी आतापर्यंत रुपये ५७.७५ कोटी इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे.

**सूक्ष्म सिंचन.**

**६१.** उपलब्ध व सिमित जलसाठ्याचा कमाल वापर करण्याची निकड लक्षात घेवून केंद्र शासनाने नुकतीच सूक्ष्म सिंचन योजना जाहीर केली असून यात सध्याच्या २५ टक्के ऐवजी आता ५० टक्के अनुदान मिळणार आहे. यामध्ये केंद्र हिस्सा ८० टक्के व राज्य हिस्सा २० टक्के राहणार. सन २००५-०६ मध्ये केंद्र शासनाकडून सुमारे रुपये ६० कोटी निधी मिळणे अपेक्षित असून सन २००६-०७ मध्ये सुमारे रुपये १०० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**नांदेड येथे केळी व बदनापूर येथे मोसंबी संशोधन केंद्र.**

**६२.** एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत नांदेड येथे केळी संशोधन केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. याकरिता रुपये ९० लक्ष खर्च करण्यात येणार आहेत.

**६२.१.** त्याचप्रमाणे बदनापूर येथे मोसंबी संशोधन केंद्र स्थापन करण्यात येणार असून याकरिता रुपये १ कोटी खर्च करण्यात येणार आहे.

**बर्ड फ्ल्यूवर नियंत्रण.**

**६३.** नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर व जळगाव जिल्ह्यातील कोंबड्यांमध्ये बर्ड फ्ल्यू (H5N1) या रोगाची लागण झाल्याच्या

आढळून आल्याने ती आटोक्यात आणण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू झाले आहेत. यासंदर्भात बाधीत पोल्ट्री धारकांना अधिक मदत देण्याबाबतचा अभ्यास करित असून केंद्र शासनाच्या यंत्रणेशी समन्वयही साधत आहे. यावर्षी आतापर्यंत रुपये ६.१० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. कुकुटपालनावर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातली मोठी लोकसंख्या अवलंबून आहे. या उद्योगासमोर आज आस्मानी संकट उभे राहिलेले आहे. पक्षी, त्यांचे खाद्य व अंडी ठेवण्याचा प्रश्न याबाबतीत त्यांना मदत करण्यासाठी शासन त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिल. हा व्यवसाय वाचवण्यासाठी आवश्यक तो निधी त्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**मत्स्य व्यवसाय.** ६४. सागरी क्षेत्रामध्ये मच्छिमार नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमने २,१६९ नौकांना अर्थसहाय्य दिले आहे. तसेच मच्छिमार सहकारी संस्थांना १०८ ट्रक व १२ बर्फ कारखान्यांसाठी कर्जरुपाने अर्थसहाय्य पुरविण्यात आले आहे. तसेच मच्छिमार बंदरावर मुलभूत सुविधा पुरविण्याची ९२ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. राज्याच्या सागरी किनाऱ्यावरील १८४ मासळी उतरविण्याच्या केंद्रापैकी १३ मासळी बंदरे व ३८ जेट्टी असे एकूण ५१ बांधकामांचा समावेश कोकण विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आला आहे. त्यापैकी ११ जेट्टीची कामे पुर्ण झाली असून ३ मासळी बंदरांची व १० जेट्टीची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २००६-०७ या वर्षाकरिता मासळी बंदर व जेट्टीच्या बांधकामासाठी तसेच सर्वेक्षणासाठी रुपये ४४.८९ कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**६४.१.** मत्स्यव्यवसायाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांतर्गत सन २००६-०७ करिता राज्य व जिल्हास्तर योजनांसाठी रुपये ३६.३३ कोटी नियतव्यय प्रस्तावित असून त्या व्यतिरिक्त रुपये ४६.१२ कोटी केंद्र हिस्सा व रुपये २९.५५ कोटी राष्ट्रीय सहकार विकास निगम हिस्सा प्रस्तावित करण्यात आला आहे.

**मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प.**

**६५.** राज्यात मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे योजना (राज्यस्तर) द्वारे आतापर्यंत म्हणजे जून २००५ अखेर अंदाजे ४०.०३ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे, तसेच वार्षिक योजना २००५-०६ या हंगामामध्ये मोठे, मध्यम व लघुपाटबंधारे योजना (राज्यस्तर) द्वारे १.०४ लक्ष हेक्टर इतकी अधिक सिंचन क्षमता निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. अशा रितीने जून २००६ अखेर एकूण ४१.०७ लक्ष हेक्टर इतकी सिंचन क्षमता या योजनेद्वारे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. सन २००६-०७ या वर्षात २ लक्ष हेक्टर इतकी अतिरिक्त क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प.**

**६६.** महाराष्ट्र राज्यात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने एकूण ४ प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत, त्यापैकी महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प हा एक प्रकल्प असून या प्रकल्पाचा शुभारंभ दिनांक २४ नोव्हेंबर २००५ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते मुंबई येथे संपन्न झाला आहे.

**६६.१.** या प्रकल्पासाठी जागतिक बँकेने रुपये १,५३५ कोटी इतके दिर्घकालीन व अल्पदराचे कर्ज उपलब्ध केले आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रुपये १,८६० कोटी असून त्यापैकी शासनाचा वाटा रुपये ३२५ कोटी इतका असेल. या प्रकल्पाचा प्रकल्प कालावधी ६ वर्षाचा आहे.

**६६.२.** या प्रकल्पाचे मुख्य उद्देश बहुविध क्षेत्रातील जलसंपत्ती नियोजन, विकास आणि शाश्वत व्यवस्थापन याबाबत राज्याची क्षमता वाढविणे आणि सिंचन सेवा सुधारीत करून सिंचन क्षेत्रातील पीक उत्पादकता वाढविणे हे आहेत.

**६६.३.** या प्रकल्पामध्ये जलसंपदा विभागाचे अधिकारी, पाणी वापर संस्थामधील शेतकरी, यांच्या प्रशिक्षणाबरोबर कृषि विभागाच्या सेवांचे बळकटीकरण आणि भूजल विषयक पथदर्शी घटक यांची तरतूद आहे. महाराष्ट्रातील पुर्ण झालेल्या प्रकल्पापैंकी २८६ प्रकल्पांचे ६.७० लक्ष हेक्टर क्षेत्र पाणीवापर संस्था स्थापन करून पाणी वितरण व्यवस्थेत दुरुस्ती व सुधारणा करण्यासाठी निवडण्यात आले आहे. पाणी वितरण व्यवस्थेतील दुरुस्तीनंतर पाणीवापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील पाणी व्यवस्थापन, देखभाल दुरुस्ती पाणीवापर संस्थांनी करणे बंधनकारक आहे. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ३८९.६३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**जलविद्युत प्रकल्प.** **६७.** राज्यातील जलविद्युत प्रकल्पासाठी वार्षिक योजना सन २००६-०७ या वर्षासाठी रुपये ३०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच घाटघर उद्ंचन जलविद्युत योजना, कोयना धरण मजबुतीकरण व कोयना टप्पा ४ अधिजल भुयाराची लांबी वाढविणे ही प्रमुख कामे प्रगतीपथावर आहेत. हे सर्व प्रकल्प या आर्थिक वर्षात पुर्णत्वास नेले जातील.

**भारत निर्माण.** **६८.** सन २००५-०६ पासुन केंद्र शासनाने "भारत निर्माण" हा नवीन कालबद्ध कार्यक्रम सुरू केला असून राज्य शासन व पंचायतराज संस्था यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.या योजनेचा कालावधी २००५-०६ ते २००८-०९ असा आहे.

या कार्यक्रमात ग्रामीण विद्युतीकरण, १,००० लोकवस्तीच्या गावाला जोडणारे बारमाही रस्ते, पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित स्त्रोत, पाटबंधारे, गृहनिर्माण व प्रत्येक गावास दूरध्वनीने जोडणे या ६ विकासक्षेत्रांचा समावेश आहे. या कार्यक्रमात सहभागी होऊन राज्याचा सर्वंकष विकास करण्याचे दृष्टीने या वर्षाच्या अर्थसंकल्पात राज्याचा हिस्सा म्हणून रुपये ३९४.१७ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय या कार्यक्रमांतर्गत रुपये १,९६५ कोटी एवढा निधी केंद्र शासना कडून अपेक्षीत आहे.

**वेगवर्धित सिंचन प्रकल्प कार्यक्रम.**

**६९.** सन २००५-०६ मध्ये वेगवर्धित सिंचन प्रकल्प कार्यक्रमा अंतर्गत रुपये १,००० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत केला आहे व त्यामध्ये २९ मोठे व मध्यम प्रकल्प अंतिमतः प्रस्तावित केले आहेत. या योजने अंतर्गत प्रथमच महाराष्ट्राला लघु पाटबंधारे योजनेसाठीही सहाय्य मिळणार आहे. दोन वर्षामध्ये पुर्ण होणाऱ्या १४३ लघु पाटबंधारे योजनांचे रुपये ३६२ कोटीचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केले असून त्यास केंद्र शासनाचे सहाय्य अपेक्षित आहे. त्यामुळे येत्या २ वर्षात मोठ्या प्रमाणावर लघु पाटबंधारे योजना पूर्ण होण्यास मदत होणार आहे. सन २००५-०६ मध्ये वेगवर्धित सिंचन प्रकल्प कार्यक्रमातील प्रकल्पधरुन अतिरिक्त १ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

**६९.१.** सन २००६-०७ साठी केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन प्रकल्प कार्यक्रमा अंतर्गत मोठ्या व मध्यम प्रकल्पासाठी रुपये ८०० कोटी व लघु पाटबंधारे योजनांसाठी रुपये २०० कोटी असे एकूण रुपये १,००० कोटी इतका निधी प्रस्तावित केला आहे. यामध्ये मोठे व मध्यम प्रकल्प मिळून २९ प्रकल्प असून १२९ लघु पाटबंधारे योजनांचा समावेश आहे.

**विशेष घटक योजना.** **७०.** विशेष घटक योजनेवरील चालू आर्थिक वर्षातील रुपये १,१२२ कोटी इतक्या नियतव्ययामध्ये सन २००६-०७ या वर्षामध्ये रुपये १,२०० कोटीपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

**संत गाडगेबाबा यांच्या कर्मभूमीतील मूलभूत सुविधात सुधारणा.** **७१.** माणुसकीचा संदेश व स्वच्छतेचा मूलमंत्र रुजविणारे संत गाडगेबाबा हे महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. अमरावती जिल्ह्यातील ऋणमोचन हे गाव संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी; या गावाला मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, यावर्षी रुपये १ कोटी उपलब्ध करून दिले जातील.

**परदेश शिक्षण शिष्यवृत्तीत वाढ.** **७२.** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना सन २००३-०४ पासून सुरू करण्यात आली. त्या वर्षापासून प्रत्येक १० विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात मागणी आहे म्हणून या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करून ती २५ विद्यार्थ्यांना देण्याचे प्रस्तावित आहे.

**अनुसूचित जाती/ नवबौध्दांच्या मुलामुलींकरीता प्रत्येक तालुक्याला शासकीय निवासी शाळा सुरु करणे.** **७३.** राज्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्धांची लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. तथापि, अनुसूचित जातीच्या व नवबौद्धांच्या मुलामुलींसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत फक्त १० प्राथमिक व १ माध्यमिक निवासी शाळा चालविली जाते. अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी राहण्याची व शिक्षणाची सोय होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्याच्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अनुसूचित जातीच्या व नवबौद्धांच्या मुलामुलींकरिता निवासी शाळा सुरू करण्यात येणार आहेत. त्यापैकी सन २००६-०७ मध्ये १०० निवासी शाळा सुरू करण्यात येणार आहेत. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ करीता रुपये ९.०३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**मागासवर्गीय मुलामुलींकरीता वसतीगृहे.**

**७४.** राज्यामध्ये मागासवर्गीय मुलामुलींसाठी सध्या असलेली शासकीय वसतीगृहे, शैक्षणिक व व्यावसायिक शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने अपूरी पडतात. मागासवर्गीय मुलामुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये म्हणून पुढील वर्षापासून मागासवर्गीय मुलांसाठी ६० वसतीगृहे व मुलींसाठी ४० अशी एकूण १०० शासकीय वसतीगृहे सुरू करण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक विभागीय ठिकाणी १,००० विद्यार्थी क्षमतेची ६ शासकीय वसतीगृहे सुरू करण्यात येणार आहेत.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन.**

**७५.** विभागाची सर्व क्षेत्रीय कार्यालये एकत्र आल्यामुळे विभागाच्या सर्व योजना, माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी म्हणून अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीकरीता सांस्कृतिक सभागृह, संगणक केंद्र, माहिती केंद्र व ग्रंथालय इत्यादि सर्व सुविधांयुक्त असेलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन प्रत्येक जिल्ह्यामध्ये बांधण्यात येणार आहे. यासाठी अंदाजे रुपये १३९ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

**कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.**

**७६.** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत द्रारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध, भूमीहीन शेतमजूर कुटुंबाला उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून ४ एकर कोरडवाहू जमीन किंवा २ एकर ओलीताखालील जमीन खरेदी करण्यासाठी शासनामार्फत ५० टक्के कर्ज व ५० टक्के अनुदान देण्याची योजना आहे. या योजनेंतर्गत जमीन वाटप केलेल्या लाभार्थ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी विशेष घटक योजनेंतर्गत ९० टक्के अनुदानावर पॉवर टीलरचा पुरवठा करण्यात येणार आहे तसेच विहिर व केरोसीन पंपही देण्यात येणार आहेत.

**श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्राहालयाचे विस्तारीकरण व सुशोभिकरण**

७७. सातारा येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्राहलय हे शिवकालीन दुर्मिळ वस्तुंचे प्रदर्शन व अभ्यास करण्यासाठी सुरु केलेले आहे. शिवकालीन साम्राज्याने व्यापलेल्या प्रदेशातील तत्कालिन कला, संस्कृती व इतिहासातील विविध वस्तुंचे जतन करण्याच्या दृष्टीने संग्राहालयाचे विस्तारीकरण व सुशोभिकरण करण्याचे राज्य शासनाने ठरविले असून यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद करण्यात येईल.

**मराठी नाट्य निर्मितीसाठी नवीन पॅकेज.**

७८. दर्जेदार मराठी चित्रपटांप्रमाणेच दर्जेदार मराठी नाट्य निर्मितीसाठी सातत्याने मराठी नाट्य निर्मिती करणा-या संस्थांना त्यांच्या दर्जाप्रमाणे सर्वस्वी एका नवीन नाट्य निर्मितीसाठी व प्रयोग करण्यासाठी प्रत्येक प्रयोगाला रुपये १५,००० याप्रमाणे अ, ब, क, व ड या दर्जाप्रमाणे अनुक्रमे कमाल रुपये १००, ७५, ५० व २५ प्रयोगांसाठी अनुदान देण्याची योजना मंजूर केली आहे. तसेच संगीत नाटकासाठी प्रत्येक प्रयोगाला रुपये २०,००० एवढे अनुदान मंजूर करण्यात येईल. सदर योजना सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून दोन वर्षासाठी राबविण्यात येणार आहे. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये २.७४ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थींना शिष्यवृत्ती.**

७९. राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थांना गरीब परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेण्यास अडचणी येतात. परिणामी त्याच्यांत बौद्धीक क्षमता असूनही उच्च शिक्षणांपासून वंचित राहतात. हे पहाता आर्थिक मागास विद्यार्थांनाही शिष्यवृत्ती सुरु करण्याचा शासनाचा विचार आहे.

**पुराभिलेख संचालनालयासाठी नवीन प्रशासकीय इमारत.**

८०. पुराभिलेख संचालनालय, मुंबई या कार्यालयाच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास, आराखड्यास व रुपये १९.४८

कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे. या पुराभिलेखागारात सन १६३० पासूनचे अभिलेख जतन करून ठेवण्यात आलेले आहेत. यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील काही महत्त्वांच्या नोंदीचे संदर्भ आहेत. १८८५ मधील राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र बोस, स्वांतत्र्यवीर सावरकर, वासुदेव बळवंत फडके, सेनापती बापट आणि महात्मा फुले यांच्या संबंधातील ऐतिहासिक कागदपत्रे याठिकाणी उपलब्ध आहेत. थोडक्यात, भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास सांगणारी अस्सल कागदपत्रे जतन करून ठेवण्यात आलेली आहेत. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये २ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**सचिवालय जिमखान्याच्या इमारतीचे नूतनीकरण.**

८१. सचिवालय जिमखाना हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहे. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांना खेळ, व्यायाम व इतर सुविधा उपलब्ध करण्यासाठी सचिवालय जिमखान्याच्या इमारतीच्या नूतनीकरणाच्या कामाकरिता सन २००६-०७ या वर्षात रुपये १ कोटी इतका निधी प्रस्तावित करत आहे. या उपर आवश्यक तो निधी भविष्यकाळात उपलब्ध करण्यात येईल.

**पारधी जमातीसाठी विशेष योजना.**

८२. राज्यामध्ये पारध्यांसारख्या काही जमातींपैकी पारधी जमात ही विकासापासून पूर्णपणे वंचित राहिलेली आहे. त्यांना नागरी सुविधाच काय पण आजही भटकंतीचे जीवन जगावे लागत आहे, तसेच मतदानाचाही अधिकार डावलला जात आहे, त्यांचा दारिद्र्य रेषेखाली सर्वेक्षणामध्ये समावेश होत नाही आणि त्यांचेवर गुन्हेगारीचा शिक्का मारुन एका गावातून दुसऱ्या गावात हुसकावून लावले जाते, अशा दुर्दैवी जीवांना स्थैर्य देण्याचा

माझा विचार आहे. यासाठी त्यांना जमीन खरेदी करुन देणे, घरे बांधून देणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची खास व्यवस्था करुन देणे, यासाठी एक विशेष योजना तयार करुन समाजाच्या प्रगतीत त्यांनाही सामावून घेण्याचा प्रयत्न राहील. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ करीता रुपये ३० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येइल.

**खाजगीकरणांच्या कामांची सद्य:स्थिती.**

**८३.** शासनाने राज्यातील राज्य महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गाचा विकास प्रभावीपणे करण्यासाठी काही महत्वाचे ५४५ प्रकल्प रुपये २१,८७४ कोटीचे खाजगीकरणाच्या माध्यमातून हाती घेतले आहेत. यापैकी रुपये ३,८४४ कोटींचे १८६ प्रकल्प अगोदरच पुर्ण झालेले आहेत. तर रुपये ४,४६५ कोटींचे १५२ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या व्यतिरिक्त रुपये १३,५६५ कोटींचे २०७ प्रकल्प नियोजनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहेत.

**रस्ते विकास कार्यक्रम.**

**८४.** राज्यातील सर्वसाधारण क्षेत्रातील १,००० पेक्षा अधिक आणि डोंगरी अथवा आदिवासी क्षेत्रातील ५०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली खेडी बारमाही रस्त्याने जोडण्याच्या कार्यक्रमा अंतर्गत दिनांक ३१ मार्च २००५ पर्यंत ३८,२६२ खेडी बारमाही रस्त्याने जोडली गेली आहेत, त्याचप्रमाणे १,१४,०६५ किलोमिटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण झालेले आहे.

**पुरहानीमुळ नुकसानग्रस्त रस्त्यांचा दुरुस्ती कार्यक्रम.**

**८५.** राज्यात जुलै आणि ऑगस्ट २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या रस्ते दुरुस्तीच्या कामांसाठी रुपये २०० कोटी एवढ्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. योजनेतर निधीतून रुपये २४८ कोटी खर्च करून तातडीच्या तात्पुरत्या दुरुस्तीची कामे पुर्ण करण्यात आली आहेत.

**राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण.**

८६. शासनाने विशेषत्वाने मराठवाडा आणि विदर्भातील कृषीवर आधारीत उद्योगांच्या विकासासाठी पायाभूत सुविधा म्हणून काही महत्वाच्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याचा महत्वकांक्षी कार्यक्रम आखला आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या सहकार्याने शासन राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा विचार करीत आहे. यामुळे राज्यातील महत्वाची शहरे जशी कोल्हापूर, पुणे, औरंगाबाद, अकोला आणि अमरावती ही शहरे नागपूर शहराशी जोडली जातील.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना.**

८७. राज्यात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामास गती मिळाली असून सन २००६-०७ या वर्षाकरिता भारत निर्माण योजनेखाली ६,०७९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची डांबरीकरणाची कामे केंद्र सरकारकडे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

**बाराव्या वित्त आयोगाचा निधी.**

८८. पंचायत राज संस्थांचे सर्व स्तरावर बळकटीकरण करण्यासाठी बाराव्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्यामध्ये २५:२५:५० या प्रमाणात वाटण्यात आला आहे. यातून मुख्यत: देखभाल व दुरुस्तीची कामे घ्यायची आहेत. केंद्र शासनाकडुन पहिल्या हप्त्यापोटी रुपये १९८.३० कोटी प्राप्त झाले असुन, रुपये १७० कोटी इतक्या रकमेचे वितरण करण्यात आले असुन, रुपये २८.३० कोटी इतका निधी डाटाबेस निर्माण करणे यासाठी राज्य स्तरावर राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच १९८.३० कोटीचा दुसरा हप्ताही अपेक्षित आहे.

**मोटारबोटी पुरवठा.**

८९. गेल्या वर्षी आलेल्या पूराच्यावेळी मोटारबोटींची पडलेली कमतरता लक्षांत घेता नद्यांमधील प्रवासी वाहतूकीसाठी

मोटारबोटी खरेदी करण्यासाठी उपलब्ध असणारा नियतव्यय रुपये २५ लक्ष वरुन रुपये १०६ लक्ष एवढा वाढविण्याचा प्रस्ताव मी करीत आहे.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना.**

**९०.** संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ पासून राज्यभर पूर्णपणे एकात्मिक स्वरूपात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत रोजगाराचा भाग म्हणून मजुरांना दारिद्र्य रेषेखालील सवलतीच्या दराने ५ किलो ग्रॅम अन्नधान्य प्रति व्यक्ती प्रति दिन वाटप करण्यात येत असून, उर्वरित मजुरी रोखीने प्रदान करण्यात येत आहे.

**९०.१.** या योजने अंतर्गत एकूण रूपये २८५.८४ कोटी इतका खर्च झालेला असून त्याद्वारे ३.६९ कोटी मनुष्यदिन निर्मिती झालेली आहे. तसेच कामावरील मजुरांना मजुरीचा भाग म्हणून एकूण २.४६ लक्ष मेट्रीक टन अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

**लघु पाटबंधारे योजना.**

**९१.** शासनाने ० ते १०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेल्या लघुपाटबंधारे योजनांसाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ९७.१६ कोटीचा नियतव्यय उपलब्ध करून दिला असून त्याद्वारे या वर्षात अंदाजे ३७,००० हेक्टर्स सिंचन निर्मितीचे उद्दिष्ट गाठण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे १०१ ते २५० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेल्या लघुपाटबंधारे योजनांसाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ७७.७५ कोटीचा नियतव्यय उपलब्ध करून दिला असून त्याद्वारे ३२,००० हेक्टर्स सिंचन निर्मितीचे उद्दिष्ट ठरविले आहे.

**आदर्श गांव योजना.**

**९२.** आदर्शगांव योजनेंतर्गत सद्य:स्थितीत ३३ जिल्ह्यातील १५६ तालुक्यातून २२२ गांवांची निवड केलेली आहे. या सर्वच गावांमध्ये शासनाच्या विविध विभागांचे कार्यक्रम प्राथम्याने

राबविण्यात येत आहेत. आदर्शगांव योजना ही स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. सन २००६-०७ या वर्षाकरिता या योजनेसाठी रुपये २ कोटी इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

**विभागीय संदर्भ सेवा केंद्रांची स्थापना.**

**९३.** महसुल विभागीय मुख्यालयी अतिविशेषज्ञ आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने संदर्भसेवा रुग्णालये स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यानुसार प्रथम टप्प्यामध्ये नाशिक व अमरावती येथे अतिविशेषज्ञ सेवा रुगणालये सुरू करावयाची आहेत. नाशिक येथे संदर्भ सेवा रुग्णालय प्रकल्पाच्या इमारतीपैकी आतापर्यन्त मुख्य इमारतीचे ९० टक्के बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच निवास संकुलनाचे बांधकाम पूर्ण होऊन परिष्करणाचे कार्य प्रगतीपथावर आहे. दुसरे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे सुरू करण्यास शासनाने मंजुरी दिलेली असून त्यानुसार बांधकामास सुरूवात करण्यात आलेली आहे. सन २००६-०७ मध्ये या योजनेसाठी रुपये २५.८५ कोटींची नियतव्यय प्रस्तावित करण्यात आली आहे.

**व्यवसायोपचार व भौतिकोपचार विभागांसाठी नागपूर येथे इमारत बांधणे.**

**९४.** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे व्यवसायोपचार व भौतिकोपचार विभागांसाठी स्वतंत्र नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या इमारतीसाठी अंदाजे रुपये ९१.३७ लक्ष इतका खर्च अपेक्षित असून सन २००६-०७ करिता या प्रयोजनार्थ रुपये ५० लक्ष इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा विकास.**

**९५.** लातूर, अकोला व कोल्हापूर येथे नव्याने चालू केलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार विकास करण्यासाठी सन २००६-०७ करिता रुपये २१.०८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**सर्व शिक्षण मोहिम.** **९६.** केंद्र शासनाने चालू पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राज्याकरिता सर्व शिक्षण मोहिमेंतर्गत रुपये २,०४४.२४ कोटींचे प्रकल्प मंजूर केले असून या योजनेवर आतापर्यंत एकूण रुपये १,१६४.३८ कोटी एवढा खर्च झाला आहे. या योजनेसाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता राज्यहिश्यापोटी रुपये २६४.०६ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**शिक्षकांना संगणक प्रशिक्षण.** **९७.** शासनाने मायक्रोसॉफ्ट इंडिया या कंपनीचा शिक्षकांना विनामूल्य संगणक प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव मान्य केला आहे. सदर कंपनीने पुणे व नागपूर येथे दोन संगणक प्रशिक्षण केंद्र २००५ मध्ये सुरू केली आहेत. या प्रशिक्षणाचा लाभ औरंगाबाद विभागातील शिक्षकांनाही घेता यावा यासाठी कंपनीस औरंगाबाद येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याकरिता शासनाने मान्यता दिली आहे. सन २००५-०६ मध्ये १,६१२ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले असुन, सन २००६-०७ या वर्षात सुमारे ३,००० शिक्षकांना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येईल.

**शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम.** **९८.** राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाचा संख्यात्मक विकास समाधानकारक झाला असून यापुढे प्राथमिक शिक्षणाच्या गुणात्मक विकासाकडे लक्ष देणे अगत्याचे झाले आहे. त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षापासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील इयत्ता १ ली ते ७ वी या वर्गाकरिता शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत या वर्गातील विद्यार्थ्यांची प्रथमतः पायाभूत चाचणी आयोजित करण्यात येईल. या चाचणीमध्ये जे विद्यार्थी ७५ टक्यापेक्षा जास्त गुण मिळवतील त्यांची आशयज्ञान चाचणी घेतली जाईल. या पद्धतीने राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जावर शासन लक्ष ठेवू शकेल. तसेच सर्व शिक्षकांचे व संपूर्ण

पर्यवेक्षीय यंत्रणेचे उत्तरदायित्व सुनिश्चित होण्यास मदत होईल. परिणामी राज्यातील सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेतील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी उच्च दर्जाचे शिक्षण पूर्ण करतील अशी अपेक्षा आहे.

**क्रीडा संकुलाची स्थापना.** **९९.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात क्रीडा व शारिरीक शिक्षणास महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. राज्य शासनाने आखलेल्या क्रीडा धोरणानुसार जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुले, तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुले व विभागीय स्तरावर विभागीय क्रीडा संकुले स्थापन करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सद्य:स्थितीत २९ जिल्हा क्रीडा संकुलांचे, ४ विभागीय स्तरावरील क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर आहे. सन २००६-०७ या वर्षाकरीता सदर प्रयोजनार्थ रुपये ३९ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना.** **१००.** ही योजना राज्यात दिनांक २० ऑगष्ट २००३ मध्ये सुरू करण्यात आली असून सन २००५-०६ या आर्थिक वर्षात रुपये २.७० कोटीची तरतूद केली असून त्यामध्ये राज्यातील सुमारे २.१८ कोटी विद्यार्थ्यांना सुरक्षा कवच देण्यात आले आहे. वार्षिक योजना २००६-०७ मध्ये रुपये २.७० कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण, कोल्हापूर या संस्थेस निधी.** **१०१.** श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर या संस्थेस ७५ व्या महोत्सवी वर्षानिमित्त विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी रुपये ७५ लाख एवढा निधी या वर्षासाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

**शतायु ग्रंथालयाना विशेष अनुदान.** **१०२.** राज्यातील जनतेला गेली १०० वर्षे ग्रंथालयाच्या माध्यमातुन ज्ञानार्जनाची उल्लेखनिय सेवा देत असलेल्या एकूण ७७ शतायु ग्रंथालयाना त्यांचे जुने व दुर्मिळ ग्रंथाचे जतन, संवर्धन व दर्जा उंचावण्यासाठी प्रत्येक ग्रंथालयास रुपये ५ लक्ष याप्रमाणे

एकूण रुपये ३.८५ कोटी एवढे प्रोत्साहनात्मक विशेष अनुदान देण्याचे शासनाने ठरविले आहे.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जात वाढ करणे.**

**१०३.** मा.केंद्रीय वित्त मंत्री यांनी त्यांच्या सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये जागतिक स्तरावरील कुशल मनुष्यबळ तयार करण्याकरिता देशातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा येत्या ५ वर्षात दर्जा वाढ उंचावून त्याना सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रुपांतर करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने १० व्या पंचवार्षिक योजनेत या योजनेचा प्राधान्य योजना म्हणून समावेश केला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये देशातील १०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सदर योजना सुरू केली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने पुढील चार वर्षात मुंबई, दादर (मुली), मुलुंड, ठाणे, अंबरनाथ, महाड, नाशिक, औंध-पुणे, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, नागपूर व अमरावती या १२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा दर्जा उंचावून त्यांचे सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये रुपांतरण करण्याचे प्रस्तावित केले आहे. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ करीता रुपये ९ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**किमान आधारभूत किंमतीने धान्य खरेदी योजना.**

**१०४.** राज्यातील शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचा लाभ देण्यासाठी सन २००५-०६ या खरीप पणन हंगामात राज्यभरात सुमारे ८६३ खरेदी केंद्र उघडण्यात आली असून या हंगामात आतापर्यंत १५.०३ लक्ष क्विंटल भात, ६.६७ लक्ष क्विंटल ज्वारी, २.९० लक्ष क्विंटल मका व ५८५ लक्ष क्विंटल बाजरी खरेदी करण्यात आली आहे. यासाठी राज्य शासनाने स्वतःच्या निधितून सुमारे रुपये १३०.२० कोटीचा निधी गुंतवून, शेतकऱ्यांना आधारभूत किंमतीच्या लाभाची सुनिश्चिती केली आहे.

**दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका-धारकांना सवलत.**

**१०५.** राज्यातील गोर-गरीब जनतेला दिलासा देण्याच्या उद्देशाने दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दराने तांदूळ उपलब्ध करून देण्यासाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ८१.१८ कोटी इतका तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याशिवाय अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत धान्य वितरणावरील खर्चासाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ५८.९२ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. अन्नपूर्णा योजनेवरील वाहतुक व वितरण खर्च भागविण्यासाठी सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये ८.०६ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान.**

**१०६.** केंद्र शासनाने देशातील नागरीकरणाचा वेग व व्याप्ती लक्षांत घेता शहरांमध्ये पायाभूत सोयीसुविधा व दारिद्र्य रेषेखालील समुहांसाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्याकरिता देशातील ६३ मोठ्या शहरांसाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम दिनांक ३ डिसेंबर २००५ रोजी जाहिर केलेला आहे. सदरहू योजना राज्यातील बृहन्मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि नांदेड या पाच शहरांत राबविण्यात येत आहे.

**१०६.१.** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत बृहन्मुंबई, पुणे आणि नागपूर या ३ शहरांचा शहर विकास आराखडा तसेच २२ विकास प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडे पाठविण्याकरता मंजूरी मिळाली आहे. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार केंद्र शासनाकडे २० प्रकल्प पाठविण्यात आलेले आहेत. केंद्र शासनास शहर विकास आराखड्यासोबत सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातले पहिले राज्य आहे. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ या वर्षात रुपये ४००

कोटी इतका नियतव्यय राज्य हिश्यापोटी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थाना विना निविदा कामे.**

**१०७.** राज्याच्या रोजगार व स्वयंरोजगार विषयक धोरणाच्या अंतर्गत बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी सेवा संस्थांना रुपये ५ लक्ष पर्यंतची शासकीय, निमशासकीय व शासकीय उपक्रम इत्यादी मधील कामे विना निविदा देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे या संस्थांना जास्तीत जास्त शासकीय कामे मिळतील व त्यातून स्वयंरोजगारास चालना मिळेल.

**आदिवासी प्रशिक्षणार्थींच्या विद्यावेतनात वाढ.**

**१०८.** शासनाने आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन योजनेंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींच्या विद्यावेतनात दरमहा रुपये ३७५ वरुन रुपये १,००० अशी वाढ करण्याचा व प्रशिक्षणार्थींना चार पुस्तकांचा संच विनामुल्य देण्याचा निर्णयही घेतला आहे. त्याचप्रमाणे तज्ञ व्याख्याते व प्राध्यापकांचे मानधन प्रती तास रुपये ४० वरुन वाढवून ते रुपये १०० करण्यात आले आहे.

**सुशिक्षित बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान.**

**१०९.** सुशिक्षित बेरोजगारांनी स्थापन केलेल्या सहकारी सेवा संस्थांना प्रती सदस्य प्रती वर्ष रुपये १,२०० प्रमाणे ३ वर्षाकरिता व्यवस्थापकीय अनुदान देण्यासाठी सन २००६-०७ या वर्षामध्ये रुपये ४ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**व्हिडीओ वार्तालाप.**

**११०.** शासनाने फौजदारी न्यायप्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी आणि पोलिस दलावरील ताण कमी करण्यासाठी शहरातील महानगर दंडाधिकारी न्यायालये व मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्या दरम्यान संपर्क साधण्याकरिता व्हिडीओ वार्तालाप योजना सुरू केलेली आहे. राज्य शासनाच्या सततच्या प्रयत्नामुळे राज्याच्या

सत्र न्यायालयामधील खटले प्रलंबित राहण्याचा कालावधी कमी झाला असून फौजदारी प्रकरणे दाखल झाल्यापासून एक वर्षाच्या आत प्रकरणांची सुनावणी हाती घेणे शक्य झाले आहे.

**राज्य विधी सेवा प्राधिकरण.**

**१११.** राज्यात विधी सेवा प्राधिकरण अतिशय चांगल्या प्रकारे कार्य करीत असून प्राधिकरणाने डिसेंबर २००५ पर्यन्त १,८१७ लोक न्यायालये भरविली, त्या लोक न्यायालयाद्वारे २८,१७७ इतकी प्रकरणे निकाली काढली आहेत. महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाची एक वेबसाईट सुरू केली असून राज्य शासनाने मंजूर केलेले सर्व अधिनियम व अध्यादेश वेबसाईटवर घेण्यास सुरूवात केली आहे. तसेच शासनाने राज्यातील न्यायालयीन कामकाजाचे अद्यावतीकरण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर सुरू केलेला आहे.

**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना.**

**११२.** राज्यातील १२ जिल्ह्यांत दिनांक २ फेब्रुवारी २००६ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यात येत आहे. सन २००६-०७ या वित्तीय वर्षाकरिता या योजनेकरिता रुपये ५७१.६१ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**केंद्र पुरस्कृत आंतर्देशिय जल वाहतुक योजना.**

**११३.** आंतरदेशिय जलवाहतुकीच्या विकासासाठी सन २००५-०६ या वर्षापासून राज्यात आंतर्देशिय जलवाहतुकीची केंद्र पुरस्कृत योजना राबविण्याचे ठरविण्यात आले आहे. या वर्षी या प्रकल्पासाठी रुपये २२.४८ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. सदरहू योजनेत ६ प्रकल्पांसाठी ९०:१० या तत्वावर भारत सरकारने मंजूरी दिली आहे.

**११३.१.** नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी व रायगड जिल्ह्यातील मांडवा राजपुरी येथे काम सुरू झाले असून रायगड जिल्ह्यातील दिघी, करंजा व जंजिरा किल्ला येथील कामांकरिता निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

**११३.२.** ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात अंतर्गत जलवाहतुकीद्वारे प्रवासी तसेच मालवाहतुकीस फार मोठ्या प्रमाणात चालना मिळणार असुन त्यामुळे रस्ते व रेल्वे मार्गावरील वाहतुकीचा ताण निश्चितपणे कमी होण्यास मदत होणार आहे.

**राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण.**

**११४.** सन २०००-०१ ते २००४-०५ या कालावधीत राज्य शासन केंद्र शासनाच्या मदतीने मोटार वाहने, साधनसामुग्री, दळणवळण, प्रशिक्षण, शस्त्रे, पोलीस हाऊसिंग, इमारत, संगणकीकरण न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा व गृहरक्षक दल यांच्या आधुनिकीकरणासाठी व उन्नतीसाठी पोलीस दल आधुनिकीकरणाची सुधारित योजना राबविली आहे. सदर कालावधीत या योजनेंतर्गत एकूण रुपये ६५४.१२ कोटी इतका खर्च झालेला आहे.

**११४.१.** सन २००५-०६ पासून पुढील ५ वर्षासाठी ही योजना चालू राहणार असून सन २००५-०६ या आर्थिक वर्षाकरीता रुपये १५१.९५ कोटीच्या आराखड्यास मान्यता प्राप्त होऊन त्याची अंमलबजावणी सुरू आहे. सदर योजनेकरिता सन २००६-०७ या वर्षाकरिता रुपये १८४.२० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**पोलीस कर्मचाऱ्याना निवासस्थान.**

**११५.** पोलीस विभागाच्या कार्यालयीन व निवासी इमारती बांधण्यासाठी सन २००६-०७ या वर्षात रुपये १०० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला असून त्यापैकी रुपये ७५ कोटी इतका निधी प्रतिसाधीत कर्जरुपाने उभारण्यात येणार आहे व उर्वरित निधी अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**संयुक्त सागरी गस्त.** **११६.** शासनाने दिनांक २३ जून २००५ रोजी केंद्र शासनास मुंबईसह राज्याच्या संपुर्ण किनारा संरक्षणासाठी रुपये ४४.६५ कोटी अंदाजित खर्चाची सुधारित किनारा सुरक्षा योजना सादर केली होती. त्यापैकी रुपये ४०.९२ कोटी इतक्या अंदाजित खर्चास केंद्र शासनाच्या उच्चस्तरीय समितीने मंजूरी दिली असून सन २००५-०६ च्या खर्चासाठी रुपये २.१९ कोटी इतके अनुदान केंद्र शासनाने मंजुर केले आहे. आर्थिक वर्ष २००६-०७ साठी रुपये ३.५० कोटीचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण.** **११७.** मोटार वाहन विभागाच्या आस्थापनेवरील २२ सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करणे, तसेच विक्रीकर विभागाच्या आस्थापनेवर सदर २२ सीमा तपाणी नाक्यांसह अन्यत्र नवीन ८ मिळून एकूण ३० सीमा तपासणी नाके स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमुळे शासनाच्या महसूलात भरीव वाढ अपेक्षित आहे.

**पर्यटन धोरण.** **११८.** महाराष्ट्राच्या विस्तीर्ण सागर किनाऱ्यावरील सुंदर चौपाट्या, राज्यभरातील किल्ले, धार्मिक स्थळे, जागतिक किर्तीच्या लेण्या, नैसर्गिक सौंदर्य, अभयारण्ये या सर्व बाबींचा विचार केल्यास महाराष्ट्र हे दक्षिण आशियातील पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनू शकते. हे लक्षांत घेऊन राज्य शासनाने पर्यटन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचे धोरण ठरविले आहे.

**११८.१** पर्यटन क्षेत्रासाठी सन २००५-०६ करिता रुपये ६४ कोटी इतका खर्च झाला असून सन २००६-०७ या वर्षाकरीता सदर प्रयोजनार्थ रुपये १४० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

संयुक्त वनव्यवस्थापन.

**११९.** राज्यातील वानिकी क्षेत्रामध्ये पर्यटनाला चालना देऊन जनतेमध्ये जागृती निर्माण करणे यासाठी सदर योजना प्रस्तावित आहे. सन २००६-०७ मध्ये राज्यातील वनांमधील पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी रुपये १० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**११९.१.** वनांच्या सीमांवर असणाऱ्या गावांमधील जनतेचा वनांचे संरक्षण व संवर्धन कामांमध्ये सहभाग वाढविणे यासाठी सदर कार्यक्रम राबविण्यात येतो. याद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते व वनांमधील प्रत्यक्ष फायदे जनतेला प्राप्त होतात. या कार्यक्रमासाठी सन २००६-०७ मध्ये रुपये ८.०५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

संत तुकाराम वनग्राम योजना

**१२०.** राज्यात मोठया प्रमाणावर यशस्वी झालेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाप्रमाणे संत तुकाराम वनग्राम योजना शासनामार्फत राबविण्याचे प्रस्तावित आहे. या अभियानांतर्गत वनांचे व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करणे यासाठी ग्रामीण जनतेचा पूर्ण सहभाग करुन घेण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविणा-या सर्वोत्कृष्ट तीन गावांना बक्षिसे देण्याचे प्रस्तावित आहे. प्रथम क्रमांकाचे बक्षिस रुपये १५ लक्ष इतक्या रकमेचे असून द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या गांवांना अनुक्रमे रुपये १० लक्ष व रुपये ५ लक्ष इतके असेल तसेच काही तसेच काही प्रोत्साहनात्मक बक्षिसे देण्यात येतील. यासाठी सन २००६-०७ या वर्षामध्ये सदर योजनेकरीता आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद करण्यांत येईल.

वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविणे.

**१२१.** शासनाने वने व वन्यजीव क्षेत्रास प्राधान्याच्या बाबींमध्ये समाविष्ट केले असुन, राष्ट्रीय वन धोरणाप्रमाणे सन २००७ पर्यंत २५ टक्के व सन २०१२ पर्यंत ३३ टक्के वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी

वन जमीन व वनेतर जमीनीवर प्रयत्न करण्यात येत आहेत. महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्रांपैकी २०.९१ टक्के वन क्षेत्र आहे. वनीकरणाच्या विविध योजनांच्या माध्यमातून ५०,४५० हेक्टर वृक्षाच्छादीत क्षेत्र वाढविण्याचे प्रस्तावित आहे. सन २००६-०७ साठी या योजनांसाठी रुपये ९.८३ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक उपयोगासाठी झाडांची लागवड, निकृष्ट वनांचे पुनर्वनीकरण, भरीव वनीकरण, गौण वनोंपजांची लागवड इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**पूरग्रस्तांना मदत आणि पुनर्वसन आपत्ती सज्जता.**

**१२२.** महाराष्ट्रात २००५ या वर्षी मुंबई व राज्याच्या अन्य भागात उद्‌भवलेल्या अभूतपूर्व पूरपरिस्थितीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला गंभीर फटका बसला. अमूल्य अशा जीवीत हानीबरोबरच सार्वजनिक सोयी सुविधा व खाजगी मालमत्तेची अपरिमित हानी झाली. राज्य शासनाने राष्ट्रीय आकस्मिकता आपत्ती निधीच्या आर्थिक सहाय्याने रुपये १,२०० कोटीपेक्षा अधिक रकमेची तातडीची मदत पूरग्रस्त लोकांना वाटप केली. तसेच क्षतीग्रस्त सार्वजनिक सोयीसुविधा पूर्वपदावर आणण्याचे काम तडीस नेले. केवळ काही दिवसांच्या अवधित मुंबईचे जनजीवन सामान्य स्थितीत आणण्यात आले. या अभूतपूर्व नौसर्गिक संकटात मुंबईकरींनी ज्या धौर्याने व हिमतींने तोंड दिले हे निश्चितच प्रंशसनीय आहे. अशाच प्रकारे सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, ठाणे, नांदेड, परभणी, गोंदिया इत्यादी जिल्ह्यात पुराने जनतेचे व सार्वजनिक मालमत्तेचे अपरमित नुकसान झाले. दीर्घकालीन पुनर्वसनाचे काम आम्हाला यापुढे करावयाचे आहे व त्यासाठी आवश्यक उपाययोजना व आर्थिक तरतूद शासनाद्वारे करण्यात येईल. सन २००६-०७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात आपत्ती बाधित राज्यांना त्यांच्या दीर्घकालीन

पुनर्वसन व पुनर्बांधणी कार्यक्रमासाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याच्या केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या आश्वासनामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे.

मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेऊन नुसते लढ म्हणा — कुसुमाग्रज

**१२२.१.** मदत व पुनर्वसनाच्या कामासाठी आम्ही भरपूर पैसा खर्च करीत असताना आपत्ती सज्जता व निवारणासाठी मात्र यापूर्वी आम्ही पुरेशा निधीची तरतूद करु शकलो नव्हतो. मला हे नमूद करण्यास आनंद होत आहे की, शासनाने आता प्रथमतः आपत्ती सज्जता ह्या बाबींचा योजनांतर्गत उपक्रमात समावेश केला असून त्यावरील खर्चासाठीची रुपये ६ कोटीची तरतूद विनिर्दिष्ट केली आहे. आपत्ती सज्जतेच्या क्षेत्रात राज्य अधिक सक्षम करण्यासाठी जास्तीतजास्त निधी मंजूर करण्याचा शासनाचा मानस आहे.

**विकासाचे धोरण.**

**१२३.** मी मागील वर्षी असा उल्लेख केलेला होता की, आपण आर्थिक विकासावर अधिक लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रासारख्या आर्थिक आघाडीवर असलेल्या राज्यात वाढीच्या दरामध्ये २ टक्के अतिरिक्त वाढ करून आपला वार्षिक योजनेचा आकार आगामी ५ वर्षात रुपये १०,००० कोटी पर्यंत वाढविणे शक्य आहे. यासाठी साधन संपत्तीमध्ये भरीव प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याच्या साधन संपत्तीमध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र उद्योग विकास संस्था, शहर व उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण, मुंबई महानगर रस्ते विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ इत्यादी संस्था पूरक सहाय्य करित आहेत.

साधनसंपत्तीचे नियोजन.

**१२४.** याशिवाय शासनाने राज्याच्या विकासाच्या दरामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेत आहोत. सध्या राज्यात बांधा, वापरा व हस्तांतरण या तत्वावरील प्रकल्पांना आर्थिक सहाय्य करण्याच्या धोरणास सर्वमान्यता मिळाली आहे. या तत्वावर हाती घेण्यात आलेले सर्व प्रकल्प वर्धनक्षम होण्यासाठी लागणारा निधी (Viability gap funding) देण्यास शासन बांधिल आहे. यामुळे मर्यादित साधन संपत्तीचा कैक पटीने उपयोग तर होईलच, शिवाय शासकीय व खासगी क्षेत्राच्या सहभागातून उत्कृष्ट व्यवस्थापनही उपलब्ध होईल.

विशेष आर्थिक क्षेत्र.

**१२५.** आम्ही आमच्या सर्वोच्च स्थानाचा वापर करण्याच्या दृष्टीने असेही ठरविले आहे की, राज्यातील मर्यादित साधन संपत्तीचा उपयोग करण्यास उत्तेजन मिळण्यासाठी खासगी विशेष आर्थिक क्षेत्र व उद्योग नगरी वसविण्यात याव्यात. सर्व सन्माननीय सदस्यांना अवगतच आहे की, नवी मुंबई क्षेत्रामध्ये सिडकोच्या मदतीने मोठे विशेष आर्थिक क्षेत्र उदयास येत आहे. या क्षेत्राच्या बांधकामास लवकरच प्रारंभ होणार आहे. राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे व नाशिक या भागामध्ये अशा व इतर काही प्रकल्पांमध्ये खासगी उद्योजकांनी रस दाखविलेला आहे. महाराष्ट्र शासन आणि शासनाच्या विविध प्रतिनिधीक संस्था या प्रकल्पांना भरीव मदत करण्यास बांधील आहोत.

सिंधुदूर्ग जिल्हयाचा पर्यटनदृष्ट्या विकास.

**१२६.** सिंधुदूर्ग हा जिल्हा पर्यटनदृष्ट्या महत्वाचा जिल्हा आहे. राज्य शासनाने सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला असून अशा प्रकारची पर्यटन जिल्हा ही संकल्पना भारतात प्रथमच राबविण्यात आली आहे. राज्याच्या प्रस्तावित पर्यटन धोरणामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याला विशेष पॅकेज देण्याची बाब विचाराधीन असून येथील पर्यटन व्यवसायाला अधिक ताकदीने

चालना देण्यासाठी सुंदर समुद्र किनारे व महाराष्ट्र पर्यटन विकास विभागामार्फत संपादित करण्यात आलेल्या जमिनी खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित करण्यात येतील. तसेच परुळे येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यामातून विमानतळ उभारण्यात येणार आहे. सर्वसामान्य पर्यटकांपासून विदेशी पर्यटकांपर्यंत सर्वांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन यापुढे महत्वाचे पाऊल टाकेल. सिंधुदूर्ग जिल्ह्याचा पर्यटनावर आधारित एक बृह्त आराखडा तयार करुन दिलेला आहे. सदर आराखड्यानुसार कालबद्ध कार्यक्रम आखून ह्या जिल्ह्याचा पर्यटन विकास करण्यात येईल जिल्ह्यात रुपये २५ कोटीची विविध पर्यटन विकासाची कामे चालू आहेत.

ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविलेले विंदा करंदीकर यांनी म्हटल्यानुसार,

सहयाद्रीच्या कड्याकडून
छातीसाठी ढाल घ्यावी,
उसळलेल्या दर्याकडून
पिसाळलेली आयाळ घ्यावी.

**मुंबई शहराचा विकास.** १२७. मुंबई शहर हे देशाच्या शिरपेचातील एक अमूल्य रत्न आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. मुंबई हे एक जागतिक दर्जाचे शहर म्हणून गणले जावे अशी महत्वाकांक्षा बाळगून आम्ही वाटचाल सुरू केली आहे. मुंबईतील जनतेचा तसेच केंद्र शासनाचा यास मोठा पाठींबा मिळत आहे ही प्रेरणादायी बाब आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, मुंबई महानगरपालिका, भारतीय रेल्वे इत्यादी यंत्रणामार्फत काही महत्वाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी जोराने सुरू आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी सुविधा

प्रकल्प व बांद्रा-वरळी जलसेतू प्रकल्पावर वर्ष २००५-०६ मध्ये रुपये १,५२० कोटी एवढा खर्च करण्यात आला. सुमारे रुपये १,५०० कोटी किंमतीच्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावरील मेट्रो रेल प्रकल्पाच्या निविदा प्राप्त झाल्या असून त्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. मेट्रो रेलच्या माध्यमातून सार्वजनिक वाहतूकीचे मुंबईत एक नवीन पर्व सुरू होईल यात शंका नाही. याचा पुढील टप्पा म्हणून सुमारे रुपये ९,००० कोटीच्या कुलाबा-चारकोप मार्गाच्या प्रकल्पासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मुंबई शहराच्या विकासाचा लाभ केवळ मुंबई बेटापुरताच सिमित न राहता तो मुंबई शेजारील प्रदेशात पोहचावा म्हणून योजना तयार करण्यात येत आहेत. याचाच भाग म्हणून २२ किलोमीटर लांबीच्या शिवडी-न्हावा जलसेतू प्रकल्पास शासनाने मान्यता दिली असून याची निविदा सूचना काही दिवसातच काढली जाईल. या व्यतिरिक्त वरळी व नरिमन पॉईंट जोडणारा जलसेतू तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचा पुढील टप्पाही सन २००७ मध्ये हाती घेण्याचा शासनाचा निर्धार आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचा पुढील टप्पा सन २०११ मध्ये पुर्ण झाल्यानंतर गर्दीच्या वेळात प्रवाशांची दाटी ३० ते ४० टक्के एवढी कमी होऊन मुंबईकरांचा उपनगरीय रेल्वे प्रवास सुसह्य व आरामदायक होणार आहे.

**१२७.१.** केंद्र शासनानेही मुंबई शहराच्या विकासात मोठा हातभार लावण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. गेल्या वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्रथमच मुंबईच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांना मदत करण्याचे केंद्र शासनाने जाहीर केले. यातूनच जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण मिशनचा उदय झाला. आतापर्यंत मुंबई शहरासाठी सुमारे रुपये ११,००० कोटी

एवढया रकमेचे प्रकल्प केंद्र शासनाकडे मदतीसाठी सादर करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त मुंबई आंतरराष्ट्रिय विमानतळाचे आधुनिकीकरण, मुंबई तसेच जवाहरलाल नेहरु बंदरांचा विकास इत्यादी मोठ्या प्रकल्पातही केंद्र शासनाने गुंतवणूक करण्यास सुरूवात केली आहे.

**१२७.२.** मुंबईच्या विकासाची प्रक्रिया आता सुमारे ४,५०० चौरस किलोमीटरच्या मुंबई महानगर प्रदेशामध्ये विस्तारित करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. यासाठी जागतिक बँक तसेच जपान शासनाबरोबर आर्थिक सहाय्यासाठी चर्चा सुरू आहे. पुढील १५ वर्षाचा मुंबई महानगर प्रदेशाचा विकासाचा एक समयबद्ध कार्यक्रम हाती घेऊन गुंतवणूकीच्यादृष्टिने हा प्रदेश जगातील एक अत्यंत आकर्षक ठिकाण होईल असे आमचे प्रयत्न राहतील.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग दोन कडे वळत आहे.